आंबेडकरी चळवळ आणि सोशलिस्ट-कम्युनिस्ट

लेखक : भालचंद्र दत्तात्रेय दंडवते

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 2933

REFBK-0023564

आंबेडकर प्रबोधिनी तर्फे प्रकाशित

निबंध
२९३३

आंबेडकरी चळवळ

स्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 AUG 1983

10 OCT 1983

3 JAN 1983

(कु. मा. प.)
५०००-४-८०

प्रकाशन

● आदरणीय
श्री. आय बी. शेडबाळे साहेब
यांच्या सौजन्याने

—नामदेव ढसाळ

निबंध
२९३३

आंबेडकरी चळवळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 AUG 19[illegible]

10 OCT 19[illegible]

3 JAN 1983

(कु. मा. प.)
५०००-४-८०

प्रकाशन

© नामदेव ढसाळ

प्रथमावृत्ती १९८१

मूल्य : १२ रुपये

मुखपृष्ठ/
प्रकाश
विश्वासराव

प्रकाशक/
गोविंदराव आदीक
सहाय्यक/जयदेव गायकवाड
डॉ. आंबेडकर प्रबोधिनी
९४ हाजीकासम चाळ
शाहिर अमरशेख मार्ग
जेकब सर्कल
मुंबई ४०० ०११

वितरक/
अस्मिता प्रकाशन
४५८/२ सदाशिव
पुणे ३०

मुद्रक/सुनिल चौथाई
पॅसीफीक प्रिंटर्स
दालमीया बिल्डींग
कटारीया मार्ग
माटुंगा मुंबई ४०० ०१६

संदर्भ निबंध
२९३३
२३५६८
२/७/८२

आंबेडकरी चळवळ आणि सोशॅलिस्ट/कम्युनिस्ट

• नामदेव ढसाळ

डॉ. विजय पाटकर

डॉ. पि. जी. कामत

प्रकाश गुप्ते

शरद मंत्री

सदानंद रेगे

प्रकाश विश्वासराव

आणि मुख्यमंत्री

नामदार अंतुले

या माझ्या प्रिय मित्रांना

सस्नेह.

नामदेव

दलित चळवळीत आमचे
मतभेद असूनही
मास मुव्हमेंटचे राजा ढाले,
रामदास आठवले, अरुण कांबळे
उमाकांत रणधिर
शिवाय दलित साहित्यिक
वामन वोव्हाळ, भिमसेन देठे
या सर्वांच्या
धीरामुळे मी
Myastheniagravis
सारख्या असाध्य रोगातून
लवकर बरा झालो.

आणि बाकी सगळे
स्वतःला पुरोगामि म्हणवणारे
दलित लेखक
डोळ्यावर पांघरुण घेऊन
बसले होते
साहित्यात मतभेद असावेत
वैर नव्हे.

आंबेडकरी चळवळ

आणि

सोशॅलिस्ट/कम्युनिस्ट

भाग १

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
२९३३
दा. क्र. २३५६८
निबंध २/७/८२
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

माझ्या समाजवादी दिक्षेची गोष्ट

९ जुलै १९७२ रोजी, २०४ चर्नीरोड, गिरगांव, मुंबई — संयुक्त समाजवादी पक्षाच्या कार्यालयातून खाली उतरून मी व माझे कवी मित्र ज. वि. पवार, दोघांनी 'दलित पँथर' ह्या संघटनेची स्थापना केली. ह्यापूर्वी मी स्वतः प्रजासमाजवादी पक्षात आणि नंतर डॉ. लोहियांच्या अस्पृश्यता नष्ट करण्याच्या सिद्धांताने भारला जाऊन लकवामार प्रजासमाजवादी पक्ष सोडून, लोहियांच्या पक्षात साधा कार्यकर्ता म्हणून सामील झालो.

यापूर्वी मी खेडेगावात होतो. ५८ च्या अगोदर पुणे जिल्ह्यातील दलित समाज व त्यांचे सर्व दुःख माझ्याही वाटचाला आले होते. शिवताशिवतीच्या खेळाचा त्या बालवयात जरी काही ठोस अर्थ लावता येत नव्हता तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे कार्य ह्यांच्या गोष्टी कानावर पडत होत्या. त्या ऐकून हरखून जायला व्हायचे. आनंद वाटायचा. ढुंगणावरली फाटलेली चड्डी सांभाळीत त्या काळात शाळेत तिसऱ्या–चवथ्या इयत्तेत मी शिकत होतो. माझी आई म्हारकीची कामे करून, वेसकरपणाची भाकरी आणून आम्ही जगत होतो. हाडकी हाडवळ्याच्या अल्पशा जमिनीमुळे अति मोठ्या बारदानाच्या खटल्यामुळे वडिलांनी कमाईकरिता मुंबई गाठली होती. उबगलेले सर्वच आम्ही आणि आमची वस्ती प्रखर अस्पृश्यतेशी टक्कर घेत होतो. त्याचवेळी मला ब्राह्मण कशाला म्हणतात, मराठा कोणाला म्हणतात, साळी, तेली, कोळी, महार, मांग हा काय प्रकार आहे हे मला कळू लागले. स्पृश्य देवाच्या देवळासमोरून महार-मांग चांभाराने चपला काढून चालावे, समोरून एखादी असामी येत असेल तर तिला आपल्या सावलीचा विटाळ होणार नाही एवढे स्वतःला जपावे, उन्हातान्हातून हिंडत असताना, वणवण करत असताना जर तहान लागली तर वरून वाढलेलं पाणी प्यावं. नदीवर आंघोळीला गेलो तर वरचा डोह सोडून महार-मांगांच्या खालच्या

डोहावरच अंग धुवावं. एखाद्या सामुदायिक सणासुदीत जेवणावळीत दूर पंक्तीत करगुटबंद, चूलबंद होऊन बसावं. लग्नसराईत नवरानवरीच्या अंगावरून ओवाळून फेकून दिलेली नारळ, लिंबं घरावीत. तीन रस्त्यावर-सातरस्त्यावर उतरलेल्या भूताखेताच्या भाकऱ्या गोळा कराव्यात. शाळा शिकायला मारून झोडून आईने पाठवलेच तर देवळाच्या पायरीखाली बसावे लागायचे. मास्तरांची नजरही पोचायची नाही एवढ्या खाली. शाळेत ज्ञान मिळण्याऐवजी शाळेची जमीन सारवण्यास लागणारे शेण गोळा करण्यास मास्तर नदीनाल्यावर पिटाळायचे. महारा-मांगांच्या पोरांनी शिकण्याऐवजी ऐऱ्या-गैऱ्यासारखे रानोमाळ फिरावे असा मास्तरांचा दंडकच होता. मला शाळेत जायला फार उत्साह नसायचा पण आईचा त्रास असल्यामुळे नाईलाजाने शाळेत जावे लागायचे. एक दिवस निर्णय घेऊन टाकला की, शाळेत आपल्याला इतर स्पृश्य मुले शिवत नाहीत. दुपारच्या जेवणाकरिता सोबत बसू देत नाही, पिण्याचे पाणी दुरूनच देतात. भांडणे झाली की 'घेडपाट' म्हणून चिडवतात, ह्या सर्व गोष्टींना कंटाळून शेवटी आईची मी फसगत केली. शाळेत जातो म्हणून गुराख्या पोरांबरोबर रानोमाळ भटकू लागलो. यात दोन–तीन महिने निघून गेले. एके दिवशी सकाळीच आईला बोलवायला दोन मुले आली व म्हणाली, "शाळेत नवीन मास्तर आलेत. त्यांनी बोलावलंय". मी तसा मुळात आतरंगी आणि चरबट होतो. नेहमी भांडणे आणि कलागती आणत असे. आई मला सणसणीत शिव्या हासडून शाळेत नेऊ लागली. माझ्या लक्षात आले की मी दोन महिने शाळेत गेलो नाही. आता फजिती होणार ! मी पोबारा गेला व आता आपले बिंग फुटणार ह्या भितीने पळ काढला. आई शाळेत जाऊन आली. नवीन आलेल्या मोडक मास्तरांनी मी दोन–तीन महिन्यांपासून शाळेत नसल्याचे सांगितले. आई आगबंबाळ होऊन गली. दिवसभर माझ्या नावाने तिने अख्खा गाव आरडाओरडा करून बोंबाबोंब करून पालथा घातला. तरी मी तिला सापडलोच नाही. रात्र जसजशी वाढत होती तसतशी घराकडे जाण्याची इच्छा असूनही मी घराकडे जात नव्हतो. एकुलता एक मुलगा म्हणून तिला काळजीही वाटत होती. परंतु ह्या बाबतीत नमते न घेण्याचा निश्चयच तिने केला होता जणूं ! त्या रात्री ती जेवलीही नाही. मी शेवटी घरी येईन म्हणून तिने रात्रभर दरवाजे उघडे ठेवले. शेवटी भीतीने मध्यरात्री मी गुपचूप येऊन झोपलो. आई जागीच होती. दोन–चार शिव्या देऊन, मेल्या उद्या तुह्याकडे बघते म्हणत झोपली. तिने त्या रात्री मला जेवायलाही दिले नाही. मी तिच्या वागण्याने हादरूनच गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी एस. टी. गाडी पाबळला गेल्यावर तिने माझ्या दोन-तीन चुलत्यांना बोलावले. मला संकटाची चाहूल लागली. परंतु पळून जाण्याचा धीर होईना. मी रागानेच तिला म्हटले, "मला शाळेत

जायचे नाही; मला गुरंशेळ्या घेऊन दे. मी वळीत बसंन. नाहीतर तुला वेसकराच्या भाकरी मागण्याच्या कामाला मदत करीन. पण शाळेत जायला सांगू नको लय वनवास व्हतो.'' माझ्या अशा बोलण्याने तिच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तिने फाडफाड माझ्या थोबाडीत लगावून माझा खुर्दामुर्दा करून टाकला. उपस्थित असलेल्या माझ्या चुलत्यामालत्यांना उद्देशून ती म्हणाली, ''दाजीबा, ह्या झवण्याला बांधून टाका.'' अन् मला बडवत ती शाळेत घेऊन गेली. उभी वेस माझ्या या वरातीनं दणाणून गेली होती. माझ्या स्वागताला मोडक गुरुजी शाळेतून उतरून खाली आले. माझ्या आईचा विपरीत राग पाहून मास्तरही हादरून गेले. त्यांनी माझे हातपाय सोडायला सांगितले. ते वर्गात जिथे बसले होते तिथे मला घेऊन गेले. माझ्या पाठीवरून हात फिरवीत त्यांनी विचारले, '' बाळ, तुझे नाव काय ? शाळेत का नाही आलास ?'' त्यावेळी भोक पडलेल्या किंवा घोडाछाप तांब्याच्या पैशाला मिळणाऱ्या दहा-वीस गोळ्या मला दिल्या. मला हे सर्व नवीन होतं. तेव्हापासून पुढे मी दररोज शाळेत जाऊ लागलो. दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी. शाळेची गोडी लागली. मोडक सरांचे कपडे फारच स्वच्छ व साधे असत. ते ज्या खोलीत रहात त्या खोलीत चिक्कार पुस्तके असत. ते मला नेहमी खायला देत. त्यांच्या घरात साने गुरुजी, आचार्य नरेंद्र देव, बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, महात्मा गांधी यांचे चांगले फ्रेम केलेले फोटो होते. त्यांच्या चार-पांच वर्षांच्या सहवासात ते समाजवादी आहेत हे मला कळले, परंतु समाजवाद कशाशी खातात हे त्यावेळी लहान असल्यामुळे मला कळू शकले नाही. विद्वत्ताप्रचुर नाही पण साध्या सोप्या भाषेत ते आम्हाला सांगत. देशात घडणाऱ्या घटनांबद्दल बोलत, अस्पृश्यांच्या प्रश्नांबद्दल बोलत. आंबेडकरांच्या चळवळीबद्दल बोलत. त्यांनीच आम्हाला साने गुरुजींची, 'श्यामची आई', 'घडपडणारी मुले', 'तीन भावंडे' ही पुस्तके वाचावयास दिली. आमची समाजवादीपणाची सुन्ता ही अशी झाली. मोडकसरांचे उत्तरदायित्व मी आयुष्यभर मानेन कारण त्यांनी मला एका सज्ञानी, योग्य मार्गावर आणून सोडले.

● समाजवादी साहेबांच्या चळवळी आणि आम्ही

पुढे शहरात आल्यावर अनेक मोठमोठ्या समाजवादी साहेबांची नावे, त्यांच्या चळवळी आणि पक्ष यांच्या सहवासात रहावयाला मिळाले, त्याबद्दल इथे मी काही बोलत नाही. ही फक्त राजकीय दीक्षेची प्राथमिक गोष्ट सांगितली. दलित पँथर गेल्या ९ वर्षांपासून महाराष्ट्रात आहे. तिचा सर्वसामान्य कार्यकर्ता व संस्थापक म्हणून आजही मी काम करतो आहे. समाजवादी समाजरचनेच्या जाणीवा स्वीकारून दलित लढ्यात जर प्रामाणिकपणे मूलभूतरीत्या काम केले तर दलितांची सर्व

प्रकारच्या शोषणापासून मुक्ती होऊन उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही, अशी माझी ठाम धारणा आहे.

● **आम्ही असमर्थ ठरलो.**

काही अंशी आमच्याकडे, काही अंशी डाव्यांनी अुडविलेल्या गोंधळामुळे म्हणा, आमच्या पुरतेच बोलावयाचे झाले तर 'दलित पँथर' च्या निमित्ताने का होईना, शास्त्रशुद्ध पद्धतीने काम करण्यास आम्ही असमर्थ ठरलो आहोत. ह्याची कारणे जशी आम्ही स्वीकारलेल्या शास्त्रशुद्ध समाजवादी जाणीवेच्या अभावाची असावी, तसेच आमच्या अवतीभोवती असलेल्या समाजवादी आणि कम्युनिस्ट ह्यांनी उडवलेल्या गोंधळामुळे वैचारिक आणि तत्सम आहोत असे वाटते. दलित लढ्याचा ज्यांनी पाया घातला ते दलितांचे दिग्विजयी नेते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांना सामाजवादाचे, कम्युनिझमचे वावडे नव्हते हे आज आम्ही ठणकावून सांगू शकतो. परंतु आंबेडकरी चळवळीला प्रतिगामी समजून त्याचा विकृत अर्थ लावणाऱ्या डाव्यांच्याबद्दल आज आमच्या मनात घृणा आहे. माझ्या व दलित पँथर पुरते बोलायचे झाले तर आज निश्चित बोलावे असे मला वाटते. जेव्हा मी प्रजासमाजवादी पक्षात होतो, तेव्हा त्या पक्षाच्या कोणत्याही नेत्याने आम्हास कधीच डोळस होऊ दिले नाही. राष्ट्रसेवा दलाचे कबड्डीचे खेळ आणि शेकोटचा आणि गुलहौशी कवी वसंत बापटांची गाणी आणि पोस्टर लावण्याचे खळीचे डबे रात्रभर घेऊन फिरणे व शहरभर पोस्टर चिकटवणे ह्या पलिकडे आमच्या डोक्यात कसलीच भर पडली नाही. आम्ही समाजवादीही झालो नाही व असमाजवादीही झालो नाही. पुढे मित्रवर्य कमलाकर सुभेदार व लतिफ खाटीक ह्यांच्यासारख्या तरुण व समाजवादी मित्रांची गट्टी जमली. तिथेच कळले की, समाजवाद्यांमध्ये दोन पक्ष आहेत. एक लकवामार व एक खरा समाजवादी. त्यास संयुक्त समाजवादी पक्ष म्हणत. तो पक्ष सच्चे समाजवादी नेते डॉ. लोहिया यांचे नेतृत्व मानत होता. लोहियांचे अस्पृश्यता नष्ट करण्याबद्दलचे विचार आणि अस्पृश्य माणसांचे सर्व तऱ्हेचे भौतिक प्रश्न सुटण्यास मदत करायला लावणारा ६०/४० हा सिद्धांत याने मी भारावून गेलो होतो; आजही भारावून जातो आहे.

पुढे सतत समाजवादी पक्षाच्या २०४, चर्नी रोड, येथील साथींच्या सोबत राहणे, कामगारांच्या मोर्चात भाग घेणे आणि नेत्यांच्या सभेला जाणे, फार भारावल्या-सारखा काळ होता तो. अण्णा साने, बाळ दंडवते, मूर्ती, दूबे, शंकर नाईक, रमेश समर्थ, दिगंबर सातव ही सर्व मंडळी, मी दलित वर्गातला कार्यकर्ता म्हणून, कौतुक करत

असत, मदत करत असत. समाजवादासाठी काम केलं पाहिजे यासाठी उत्साह, प्रोत्साहन देत असत. यातूनच पुढे कमलाकर सुभेदार, भाऊ तोरसेकर, लतिफ खाटिक या तरुण मित्रांच्या सहकार्याने समता-मोर्चा काढला. या मोर्चात सर्व लेखक, विचारवंत, पांढरपेशे बुद्धीवादी कलावंत, तसेच मी ज्या कामाठीपुऱ्यात रहात होतो तेथील दलित कार्यकर्ते, वेश्या व हिजडे यांना समता मोर्चात सामील केले. हा मोर्चा बाबासाहेबांच्या चैत्यभूमीपासून सुरू करून त्याचे विसर्जन गोलपिठ्याजवळील गांडूबगीच्या इथे केले. विजय तेंडुलकरांसारखी, भाऊ पाध्ये, प्र. श्री. नेरूरकरांसारखी महान महान मंडळी आली होती. त्यांनी मोठी मोठी भाषणे केली. गोऱ्या कातडयांची पाँश आणि छान युक्रांदच्ची मुलंमुलीही होती. 'अरे जातपात को हटावरे' ह्या हिजड्यांच्या व वेश्यांया तोंडून घोषणा ऐकून त्यानाही धन्य धन्य वाटले. समता मोर्चा महाराष्ट्रात जोरदार गाजला. त्यावर चिक्कार टिकाटिप्पणी झाली.

● **प्रस्थापित दलित नेतृत्व आणि डावे पक्ष**

त्यानंतर महाराष्ट्रभर दलितांवर साखर-सम्राटांच्या लॉब्यांकडून, मराठा सवर्णांकडून अन्यायास सुरुवात झाली. गावोगाव दलितांवर बहिष्कार टाकण्यात आले. ठिकठिकाणी दलित स्त्रियांवर अमानुष बलात्कार झाले. ज्या इंदापूर बावडा प्रकरणाने दलित पँथर उदयास आली ती घटना याच दरम्यानची. दलितांमधील बाबासाहेबांच्या नंतरचे एकंदर समन्वयवादी/तडजोडवादी गांडू नेतृत्व हे अत्याचार थांबवू शकणार नाही, त्या काळात पँथर म्हणून काम करणाऱ्या कमलाकर सुभेदार, भाऊ तोरसेकर, भाई संगारे, ज. वि. पवार इत्यादिंच्या मनात अशी भावना निर्माण झाली आणि डावे तर एकदोन मोर्च्याच्या पुढे जात नाहीत. घुसमटायला होत होते. काही सुचत नव्हते.

आम्ही २०४, चर्नी रोड जेथे होतो तेथे कामगारांच्या भल्याच्या भानगडी-शिवाय दलितांचे काहीच नव्हते. दलितांचे प्रश्न व ते सुटण्याकरिता व अस्पृश्यता नष्ट करण्याबद्दल जे बाळ दंडवते, अण्णा साने यांसारख्या थोर कार्यकर्त्यांना, नेत्यांना आस्था होती. त्यांनादेखील ट्रेड युनियनच्या, धंद्याची मर्यादा पडली. कारण त्यांचा बॉस, मुंबईचा अनिभिषिक्त बादशहा जॉर्ज फर्नांडिस हा होता. त्याला कामगारां-शिवाय दलितप्रश्न महत्त्वाचे वाटत नव्हते. एकदा आम्ही सर्वांनीच मनाचा हिय्या करून अस्पृश्यतेच्या प्रश्नावर स्वतंत्र काहीतरी ठोस-निश्चित केले पाहिजे असे फर्नांडिसांना छोटयाशा बैठकीचे निमित्त करून सांगितले. उलट त्यात आम्हालाच पोरकट ठरविण्यात आले. त्यानंतर मात्र संयुक्त समाजवादी पक्षाशी काडीमोड

घेऊन, वय राजकीय अपरिपक्वतेचे असूनही आम्ही २०४, चर्नी रोडला रामराम ठोकला.

दलित पँथर ही संघटना पूर्ण आंबेडकरांना मानणारी असून दलितांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रतिक्रियेतून ती जन्मास आली. तिच्याकडे सुरुवातीस गोल्डन वाईस नव्हता, कुशल संघटक नव्हता. चांगल्या त्यागी कार्यकर्त्यांचा संचही नव्हता, कार्यक्रम नव्हता, संघटना म्हणून आकारही नव्हता, बांधणीही नव्हती; परंतु प्रश्न आणि दुःख एवढे होते की ती हां हां म्हणता महाराष्ट्रभर पसरली. त्यातच पुढे एक–दोन वर्षांनी वरळीची दंगल घडली. त्याचे सर्व तऱ्हेचे दायित्व दलित पँथरच्याच माथी मारले गेले. त्या वरळीच्या संघर्षातूनच आम्ही सर्व कार्यकर्ते सामाजिक व राजकीयदृष्ट्या परिपक्व व्हायला लागलो. आमच्या भोवती सर्व पुरोगामी डाव्या-उजव्यांचा फेरा जमला. अल्पशा वयात हे सर्व वाटचास आले. आम्ही सर्व त्यावेळी भांबावून गेलो, परंतु आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या मनात वर्ण व वर्गलढ्याशिवाय दलितोद्धार नाही अशी भावना होत गेली. वरळीच्या दंगलीच्या निमित्ताने पुरोगामी व डाव्या चळवळीच्या अंतर विरोधावर उजेड पडला होता, तेथेच आम्हाला समाजवादी व कम्युनिस्ट यात काय फरक आहे ते कळायला लागले. त्यांच्यात अहि-नकुलासारखे वैर का असते ते कळायला लागले. पी. एस. पी./एस. एस. पी./सी. पी. आय./सी. पी. एम./नक्षलवादी/ट्रास्काईट वगैरे कळायला लागले.

दलितांचे सर्व तऱ्हेचे भौतिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय प्रश्न असताना हे कसे सोडवायचे यांनी आम्ही भांबावून गेलो आणि जवळ त्यागाची दूरदृष्टीही नव्हती, या पार्श्वभूमीवर डावे पक्ष आमच्या नजरेत भरले. त्यांचे कलह, त्यांची भांडण, माऱ्यामाऱ्या, आम्हाला गोंधळात टाकू लागल्या. जावे तरी कुठे ? करावे तरी काय ? हा हा म्हणता एखाद्या झंझावाताप्रमाणे उभी राहिलेली पँथर डाव्या पक्षांच्या आपसातील खेचाखेची व माऱ्यामाऱ्यांमुळे दुबळी झाली. सामाजिक प्रश्न आधी की आर्थिक आधी ? मूलभूत प्रश्न आधी की सुधारणावादी प्रश्न आधी ? सरंजामशाही अगोदर मोडावयाची की भांडवलशाही ? सामंतशाही की साम्राज्यशाही ? असलेल्या शासन संस्थेचे काय ? न्यायसंस्थेचे काय ? संसदीय पद्धतीचे काय ? सारा गोंधळच उडून गेला. त्याचबरोबर आमचा मायेचा पक्ष रिपब्लिकन पार्टी (सर्व) गट यांनी आमचे नांवच घ्यायचे टाकले होते.

● डॉ. बाबा आढावांसारखे एककल्ली सामाजिक प्रेषित

एखादा नामदेव ढसाळ आंबेडकरांच्या सोबत लोहियांच्या सोबत, बाबासाहेबांना ठाम हृदयात ठेवून, लेनिन, स्टॅलिन, मार्क्स वाचू लागला, हो ची मिन्ह,

फिडल क्रॅस्टो, माओ वाचू लागला, तर ज्या ढसाळच्या आईचे दर्शन घेण्याकरिता बाबा आढावांसारखे समाजवादी प्रेषित कामाठीपुराच्या गल्ली-कुच्चीतून धावायचे व तुकारामाच्या गाथेसारखी नामदेवाची गोलपिठा ते स्वतःच्या उशाखाली घेऊन झोपायचे डॉ. आढाव पेटून उठले व दलित पँथरमध्ये त्यांनी फूट पाडली. कोणी एकनिष्ठ तर कोणी कम्युनिस्ट ; स्वतःच्या पायावर उभ्या रहावयास निघालेल्या तरुण दलित संघटनेचे आटचापाटचाच्या मैदानात रूपांतर झाले. एकीकडून समाजवादी तर दुसरीकडून कम्युनिस्ट ओढू लागले. असा हा दलित-श्रमिक ऐकजुटीचा अलिकडला इतिहास.

● कम्युनिस्टांच्याबद्दल बोलण्यापूर्वी थोडेसं प्रास्ताविक

दलित समस्या आणि डावे यांच्यासंबंधी बोलावयाचे झाले तर आंबेडकर चळवळीला पूरक होईल असे एकच नाव डॉ. लोहिया. परंतु आज डॉ. लोहियांच्या प्रेरणेने चाललेला पक्ष निष्प्रभ झाला आहे. डॉ. आंबेडकरांना कुठल्याही पुरोगामी विचाराबद्दल वावडे नव्हते. ते समाजवादाच्या व कम्युनिझमच्या विरुद्ध नव्हते. त्यांच्या कार्यान्वित पद्धतीबद्दल त्यांच्या काही शंका होत्या. परंतु या समाजवाद्यांनी व कम्युनिस्टांनी बाबासाहेबांना आपले शत्रू मानले आहे आणि म्हणून दलित चळवलीला या पुरोगामित्वाच्या नावाखाली अडथळे पुरोगामी पक्षच ठरत आहेत. यात ज्या कम्युनिस्टांचे व माझे (नामदेव ढसाळ) यांचे नाव दृगोचरित केले जायचे याबद्दल मला माझे ९ वर्षाचे अनुभव आणि माझ्या आसपास आलेल्या कम्युनिस्ट नेत्यांच्या आंबेडकरांविषयीच्या आकसाच्या भूमिकेचा परामर्श घ्यावासा वाटतो. बाबासाहेब दिग्विजयी नेते आहेतच की ज्यांच्यामुळे माझ्या सारख्या दलिताचा उद्धार झाला. कम्युनिस्ट जोपर्यंत आंबेडकरी चळवळीला खऱ्या अर्थाने अभ्यासणार नाहीत तोपर्यंत त्यांना खरा वर्गहीन समाज हिंदुस्थानात निर्माण करता येणार नाही. कम्युनिस्टांची आंबेडकरांवरील टिका ही चुकीची आहे. ते आंबेडकरांना कम्युनिस्टांविरूद्ध समजतात. ते आंबेडकरांना भांडवलशाही व साम्राज्यशाहीचे हस्तक समजतात.

● कम्युनिस्टांच्या आंबेडकरांवरील टीकेविषयी माझी प्रतिक्रिया

कम्युनिस्टांची आंबेडकरांवरील टीका ही महात्मा गांधींच्या टीकेसारखीच आहे. आंबेडकरांचा विचार सामाजिक संदर्भात करायला पाहिजे तो कम्युनिस्टांनी कधी केला नाही. त्यामुळे त्यांचे मूल्यांकन हे फार गैरलागू कसोटीवरती केलेले आहे. आंबेडकर हे कट्टर लोकशाहीवादी होते आणि तितकेच राष्ट्रवादी होते. जर देशात

यादवी झाली तर, "मी आणि माझे लोक तुमच्या बाजूने लढू" असे आश्वासनही त्यांनी फाळणीपूर्व काळात दिले होते. त्यांचे Thoughts on Pakistan हा राजकीय द्रष्टेपणाचा पुरावा आहे. आंबेडकरांना वर्णव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या भीषण सामाजिकतेविरुद्ध अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लढा द्यावयाचा होता. या लढ्याचे संपूर्ण वास्तव अथवा त्याचे महत्त्व यासाठी बाबासाहेबांना स्वीकारावी लागलेली घोरणे किंवा डावपेच यांचे योग्य आकलन सवर्णपरंपरेतून आलेल्या कोणत्याही नेतृत्वाला, त्यात साम्यवादी आणि समाजवादीही आले, या दोघाही डाव्यांना आंबेडकरी चळवळीचे आकलन झाले नाही. त्यांचे आंबेडकरांवरील हल्ले हे केवळ पारंपारिक विचार सरणीतून आणि प्रामुख्याने युरोपातून घेतलेल्या लोकशाहीच्या अथवा मार्क्सवादाच्या पुस्तकी ज्ञानावर आधारलेले होते. त्यांचे हे पुस्तकी ज्ञान किती अपुरे होते आणि वास्तवाशी विसंगत होते, हे पुढच्या इतिहासावरून सिद्ध झालेले आहे. कम्युनिस्टांच्या दृष्टीने जे गांधीजी ब्रिटीश साम्राज्यशाहीचे, भांडवलशाहीचे हस्तक होते तसेच आंबेडकरही हस्तक आहेत अशी त्यांची टिका असे. आंबेडकरांचा लढा हा मूलतः सामाजिक, भौतिक उत्थापनासाठी-समतेसाठी होता. माणुसकीच्या हक्कासाठी होता. भौतिकशोषणातून मुक्त होण्यासाठी व माणूसकीच्या प्रतिष्ठेसाठी होता. या लढ्यातून एकसंधराष्ट्रीय समाज निर्माण करण्याचे ध्येय साध्य होते. देशाचे अस्तित्वच या सामाजिक लढ्यावर अवलंबून आहे, याची जितकी तीव्र जाणीव आंबेडकरांनी दाखवली होती, तेवढी कम्युनिस्टांनी दाखवली नाही.

● आंबेडकरांच्या उदारमतवादाविषयी — सुधारणावादाविषयी

या देशातला अवाढव्य संमिश्र जातीव्यवस्थेवरील आधारलेला समाज, या समाजावरची, जाती व्यवस्थेची मगरमिठी आणि तिचे केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक परिणाम बहुसंख्य समाजावर झालेले आहेत. सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांची गुंतागुंत कम्युनिस्टांना वर्गलढ्याच्या ठोकळेबाजीमुळे आलेली नाही. त्याचे दोन परिणाम दिसून येतात. एक वर्गलढा यशस्वीरीतीने लढविण्यासाठीसुद्धा कामगारांमध्ये वर्गीय जाणीव करतानाच त्यासाठी त्याला वर्णीय भावनेपासूनसुद्धा मुक्त करायला हवे, जातीय भावनेपासून सुद्धा मुक्त करायला हवे. त्याशिवाय वर्गीय एकजूट या देशात अशक्य आहे. ह्याचे भान कम्युनिस्टांना कधीच नव्हते आणि कधीच राहणार नाही याची खंत वाटते. आजतागायत त्यांच्या कामगार संघटनांनासुद्धा जातीय भावनेपासून अलिप्त राहता आलेले नाही. या सामाजिक प्रक्रियेचा भाग म्हणून क्रांतिकारक चळवळीच्या बरोबरीने ज्यांना (कम्युनिस्ट) उदारमतवादी किंवा सुधारणावादी म्हणतात, त्यांची आवश्यकता होती आणि आहे.

स्त्रीशिक्षण किंवा दलित समाजाचे शिक्षण यांचा हा प्रसार हा या उदारमतवाद्यांनी– सुधारणावाद्यांनीच केला आहे. जातीच्या बंधनातून बहुजन समाजाला मुक्त करून आर्थिक शोषणाविरुद्ध लढण्यासाठी, त्यांची एकजूट करण्यासाठी, लोकशिक्षणाची आवश्यकता होती आणि ती आजही तेवढीच तीव्र आहे. वर्गलढ्यातून कम्युनिस्ट एवढेही शिक्षण कामगार वर्गातसुद्धा देऊ शकलेले नाहीत, हा गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास आहे. उदारमतवादी किंवा सुधारणावादी हे शब्द कम्युनिस्ट 'अपशब्द' 'शिवी' म्हणून वापरतात, तेही आंबेडकरांच्या बाबतीत, त्यावेळी काळजाला सहस्र इंगळ्या डसतात. कम्युनिस्टांच्या या कृतीवरून त्यांचेच अज्ञान व्यक्त होते. बाबासाहेब आंबेडकर हे एक क्रांतिकारक सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी जसे लढले तसे, क्रांतिकारक कार्यालाही पूरक म्हणून त्यांनी काही परंतु ठोस सुधारणावादी कार्य केले हा त्यांच्या नेतृत्वाचा गुण आहे. दोष नव्हे.

● डॉ. आंबेडकरांच्या संसदीय मार्गाविषयी

भारतीय कम्युनिस्ट लेनिन ज्याला ' इन्फेन्टाईल कम्युनिझम ' म्हणतो त्या प्रकारचे साम्यवादी असल्यामुळे त्यांना एकतर क्रांतिचे रशियन मॉडेल या शिवाय दुसरे मॉडेल माहीतच नव्हते. त्यामुळे स्वतंत्र मॉडेल निर्माण करण्याची प्रज्ञा नव्हती. त्यामुळे त्यांनी संसदीय प्रणाली विरूद्ध आणि ती स्वीकारणाऱ्या नेत्यांविरूद्ध पुस्तकी उसनवारीची टीका केली आहे. आता त्यांचे गुरुही आदरणीय डांगेबाबा संसदीय मार्गानेच समाजवाद आणण्याची भाषा करत असतात. लोकशाही, व्यक्ती स्वातंत्र्य, वृत्तपत्रीय स्वातंत्र्य, बहुपक्षीयप्रणाली ही भांडवलशाहीची (बूर्झ्वा), ठरलेली मूल्ये आता युरोपियन व भारतीय कम्युनिस्टसुद्धा मानू लागले आहेत. यावरून संसदीय प्रणालीबद्दल जे टीका करत असत ती किती मूर्खपणाची होती हे त्यांनी स्वतःच मान्य केले आहे. ज्योती बसूंचे सरकार किंवा त्या पूर्वीचे नंबुद्रीपाद यांचे सरकार हे निवडणूका लढवूनच अस्तित्वात आले होते. येलेन्दे संसदीय पद्धतीनेच निवडून आला. बाबासाहेबांना ज्या समाजासाठी स्वातंत्र्य समता प्राप्त करून घ्यावयाची होती त्या लढ्यातला एक आवश्यक कार्यक्रम म्हणून त्यांनी संसदीय मार्गाचा पुरस्कार केला. परिणामतः आज देशातील प्रत्येक वयात आलेल्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा समान हक्क संविधानाच्या द्वारे मिळवून दिला. ही एक क्रांतिकारक प्रगती होती. हे गेल्या काही वर्षातला राजकीय इतिहास पाहिल्या नंतर लक्षात येईल. आज काही नक्षलवादी सोडले तर सर्वच कम्युनिस्ट संसदीय मार्गाचा अवलंब करताहेत. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा विजय म्हटला पाहिजे. दुसरी गोष्ट संसदीय मार्ग किंवा सनदशीर राजकारण यांचा पुरस्कार करीत असतानाही लोक-

शक्ती जागृत आणि संघटित करण्याचेही कार्य बाबासाहेबांनी कधीच सोडले नव्हते. बाबासाहेबांनी दलित समाजामध्ये जी शक्ती, आत्मविश्वास निर्माण केला तेवढी शक्ती आणि आत्मविश्वास वर्गलढ्याच्या पोकळ वल्गना करणाऱ्या कम्युनिस्टांना देशातल्या कामगारवर्गामध्ये करता आलेला नाही. तेव्हा संसदीय प्रणाली किंवा सनदशीर राजकारण केल्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दोष देण्याचा कम्युनिस्टांना नैतिक हक्क नाही.

● **डॉ. आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतराविषयी**

धर्म मार्क्सवादाने त्याज्य ठरविला, त्याच्या आधारावरच कम्युनिस्टांची बाबासाहेबांनी घडवून आणलेल्या धर्मांतराबद्दल सतत टीका असते. एकूण अस्पृश्य-समाजाचा भाग हिंदुधर्माच्या प्रभावामुळे दैववादी, देववादी, वास्तवाला डावलून आध्यात्मिक कर्मविकासाच्या आहारी जाऊन निहित कर्तव्य सांभाळत होता. भौतिक प्रश्नांसाठी लढाई करण्यासाठी त्याचे मनच या सर्व गोष्टींमुळे मोडून गेले होते. स्वतंत्र मजूर पक्षापासून तो रिपब्लिकन पक्षापर्यंतच्या अनेक लढायांतून कदाचित बाबासाहेबांना हे जाणवत असावे आणि म्हणूनच ही मानसिक गुलामगिरी तोडून आपल्या मानवी हक्कांसाठी, भौतिक प्रश्न सोडवून घेण्यासाठी दलित समाजात नवीन जाणीवा, प्रेरणा याची विज्ञाननिष्ठ जाणीव धर्मांतर करून दलितांच्या मनांत रुजविली. माणसाच्या मनाला गुलाम बनविणाऱ्या धर्माचे जोखड ज्या आंबेडकरांनी फेकायला लावले, ज्या बुद्ध तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन ते आंबेडकरांना भावलेलं बुद्धतत्त्वज्ञान हे प्रतिगामी नसून या देशाच्या लोकशाही समाजवादी-मूल्यांना पूरक होईल अशाच रीतीने बाबासाहेबांनी धर्मांतराच्या निमित्ताने दिले आहे. ज्या कम्युनिस्टांना 'द्वंद्वात्मक भौतिकवादाचा आदर आहे' तोही आंबेडकरी बुद्धधर्मात आहे. याचे कौतुक पठडीखोर कम्युनिस्टांना अजूनही वाटत नाही ही एक आश्चर्याचीच बाब समजावी लागेल. दैववाद आणि कर्मविकापाचा सिद्धांत यांचा प्रभाव ज्या आंबेडकरी धर्मांतरामध्ये नष्ट करण्यासाठी बजावले आहे, अशा धर्मांतराचे डोळस आकलन, समर्थन कम्युनिस्टांनी करायला हवे. आंबेडकरांचे धर्मांतर हे समाजाला अंधश्रद्धेपासून मुक्त करण्यास उपयुक्त ठरले आहे. आजही रशिया व चीनसारख्या महान क्रांतिकारक देशातून धार्मिक भावनांची, अवशेषांची पूर्णतः हकलपट्टी तेथील राजवटींनाही करता आलेली नाही. आजही किमान या बाबतीत तरी तेथील कम्युनिस्ट तारेवरली कसरतच करतात नाजूकपणे. म्हणून आंबेडकरी धर्मांतराकडे पहाताना भारतीय कम्युनिस्टांनी आपला चष्मा उतरवून जरा स्वच्छतेने पहायला हवे. कम्युनिस्टांनी माणसाचा (Mind) एक घटक

असतो हे मान्यच केलेले नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे सामाजिक परिस्थिती बदलण्याची आवश्यकता असते त्याप्रमाणे माणसाचे मनही बदलण्याची आवश्यकता असते. केवळ सामाजिक, आर्थिक परिस्थिती बदलली म्हणजे माणसाचे मन आपोआप बदलते हे खरे नाही. याची जाणीव नसल्यामुळे भारतीय कम्युनिस्ट धर्माबद्दल आणि धर्मांतराबद्दल स्वतःच्या गणपतीचे रहस्य आणि मुलाबाळांच्या कुंडल्या आणि मुहूर्त पाहण्याचे, अंतरंग दृढ ठेवून बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराबद्दल ठोकळेबाज टीका करतात. धर्मांतरामुळे सर्व तऱ्हेच्या मानसिक गुलामगिरीपासून समाजाला मुक्त करण्याचा महान प्रयत्न बाबासाहेबांनीच केला आहे. (Mind is matter) या सूत्राची घोकंपट्टी करणाऱ्या कम्युनिस्टांना या सर्वांचा अर्थ कळू नये हे वर्गलढ्याच्या व वर्गीय एकजुटीच्या वाटचालीतील अडथळ्याचे स्थान होऊ शकेल इतके महत्त्वाचे आहे. आंबेडकरी बुद्धधर्म हा खऱ्या अर्थाने सेक्युलर, आधुनिक, व विज्ञाननिष्ठ आहे. कम्युनिस्टांचे सर्व लक्ष व बुद्धी केवळ क्लास थिअरीतच अडकलीय. वर्गसिद्धांताच्या चौकटीतच अडकलीय. भारतीय समाजाच्या एकूण शोषित वर्गाचे स्वरूप क्रांतीच्या प्रक्रियेतील त्याचे स्थान, याकडे कम्युनिस्टांचे दुर्लक्ष झाले आहे. कारखान्यांत काम करणारा कामगार किंवा शेतावर काम करणारा शेतमजूर, काही प्रमाणात आदिवासी हे तीन सामाजिक घटकच त्यांचे लक्ष वेधून घेतात. परंतु कामगार आणि शेतमजुरातही वाटले गेलेले किंवा ग्रामीण बलुतेदार पद्धतीवर जगणारे, समाजाने बहिष्कृत आणि वंचित केलेले जे दलित त्यांचे सामाजिक परिवर्तनामधले क्रांतिकारक स्थान हे कम्युनिस्टांना व डॉ. बाबा आढावांसारख्या (समाजवादी) एककल्ली फक्त सुपर स्ट्रक्चवरच दलितांनी काम केलं पाहिजे असे सांगणाऱ्या, वाया गेलेल्या सामाजिक प्रेषितांना निश्चित कळलेलं नाही. समाजवादी म्हणून आढावांसारख्यांची भूमिका ही एकांगीच असते आणि कम्युनिस्टांचीही तिच्याच विरोधी नाण्याची बाजू पण एकांगीच असते. यांच्या एकूण कार्यक्रमात दलितांच्या समता संघर्षाला, भौतिक क्रांतीच्या लढ्याला स्वतंत्र स्थान नाही. त्यांच्या साहित्यात व राजकीय अभ्यासाच्या वर्गात या प्रश्नांसंबंधी शिक्षण देण्याचे कार्य होत नाही. परिणामतः या देशाची कम्युनिस्ट चळवळ, समाजवादी चळवळ, वस्तुतः सवर्ण नेतृत्वाची उच्च मध्यम वर्गीयांची चळवळ राहिली आहे. ज्या कामगार अथवा श्रमजीवी वर्गाच्या नावाने क्रांतीच्या घोषणा करतात, त्या वर्गातूनही त्यांना नेतृत्व निर्माण करता आलेले नाही. विचाराने आणि कृतीनेही अथवा त्यांच्यासाठी लढा देऊ शकत नाही. त्या चळवळींचे पुरोगामित्व संशयास्पद मानले पाहिजे. आतापर्यंतच्या इतिहासावरून तरी असा निष्कर्ष काढावा लागेल की, जरी कम्युनिस्टांचे/सोशॅलिस्टांचे राज्य भारतात स्थापन झाले तरी सत्ता अल्पसंख्य तथाकथित पुरोगामी सवर्णांच्याच हातात राहील.

बँकांचे राष्ट्रीयीकरण होईपर्यंत बँकांमध्ये दलितांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. राष्ट्रीयकृत बँकांमध्येसुद्धा तृतीय आणि चतुर्थ श्रेणीमध्येच प्रामुख्याने त्यांची भरती. खाजगी औद्योगिक क्षेत्रामध्ये दलितांना नोकऱ्या अजिबातच मिळत नाहीत. या क्षेत्रांमधील नोकऱ्यांपासून दलितांना जवळजवळ पूर्णतः वंचित करण्यात आले आहे. केवळ सरकारी नोकऱ्यांवरतीच आज भागवावे लागते. भूमीहीन अवस्था, जमीन असलीच तर औतकाठी नाही, बी-बीयाणे नाही, भू-विकास बँकांची आणि तगायांची मेहरबानी नाही. ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट या दोन्हीही पक्षांच्या संघटनांनी केलेला नाही. रेल्वेत स्वतःला शोषित संघटना म्हणविणाऱ्या संघटनेने राखीव जागा, पद बढती रद्द करून घेण्यासाठी सुप्रिम कोर्टाकडे धाव घेतली होती. सुदैवाने कोर्टाने निकाल त्यांच्याविरूद्ध दिल्यामुळे रेल्वेतले दलित कामगार वाचले.

● केवळ राजकीय वापरासाठीच दलितांना डाव्या आघाडीत घेतात.

कोणत्याही समाजात शोषकवर्ग कोणते आणि शोषितवर्ग कोणते यांची तंतोतंत व्याख्या करणे सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने मूलभूत असते. ते विश्लेषण केवळ वर्गीय किंवा एकांगी आधारावरच आजही करण्यात येते. डॉ. लोहियाच फक्त याला अपवाद आहेत. त्यांनीच दलितांचे दिग्विजयी नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर म्हटले की, ' भारतीय समाजाचे केवळ वर्गीय विश्लेषण करून चालणार नाही. या देशातले सोशॅलिस्ट, कम्युनिस्टसुद्धा, जाणतेपणी व अजाणतेपणी परंपरेचे गुलाम असल्यामुळे, त्यांची चळवळ दलित समाजापासून अलिप्त राहिलेली आहे. औद्योगिक कारणामुळे किंवा नुसत्या मानसिक परिवर्तनामुळे अस्पृश्यता जाईल– शिक्षणामुळे अस्पृश्यता जाईल– या मताइतकाच हा भंपक प्रकार आहे. औद्योगिकरण झाले, शिक्षणाचा प्रसार झाला, बाबा आढावी थाटाची शिबिरेही झाली, तरीसुद्धा उद्योग, कारखाने, बँका, जमिनी, सामुदायिक शेती, साखर कारखाने, विज्ञान संस्था, यांमध्ये दलितांना प्रवेश मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यांना प्रवेश मिळावा यासाठी डाव्यांनी (सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट, नक्षलवादी वगैरे) वा त्यांच्या संघटनांनी काहीही प्रयत्न केलेला नाही. इतकेच नव्हे तर जेव्हा जेव्हा सवर्णांचे दलितांवर आक्रमण होते, तेव्हा तेव्हा या आक्रमणात कम्युनिस्टांसह सर्व डाव्या संघटनांचेही कामगार या आक्रमणात भाग घेऊन दलितांवर प्रहार करतात. दलित कामगारांचेसुद्धा सवर्ण कामगारांच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्याचे अथवा सवर्ण कामगारांना दलित कामगारांवर अत्याचार करण्यापासून परावृत्त करण्याचे हे कार्य कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट कोठेही करू शकलेले नाहीत. त्यांचा वर्गलढा किती पोकळ आणि दिखाऊ आहे याचा हा पुरावा. शिक्षण-

क्षेत्रातही दलितांविरूद्ध जो पक्षपात केला जातो त्याची आकडेवारी काही मार्क्सवादी विद्वान सांगतात. परंतु या प्रश्नावरही वर्गलढ्याशिवाय दुसरा पर्याय यांच्याजवळ नसल्यामुळे ते निष्क्रिय असतात. दलित कामगारांचे प्रश्न असोत किंवा कामगार नसलेल्या दलितांचे प्रश्न असोत, या प्रश्नांवर दलितांना केवळ आपल्याच शक्तीने लढावे लागते. कम्युनिस्टांची किंवा कुठल्याही डाव्या राजकीय पक्षांची त्यांना मदत मिळत नाही. ज्या चळवळीत देशातला एवढा मोठा आणि परंपरेने हजारो वर्षांपासून शोषित बनलेला वर्ग सामावून घेऊ शकत नाही. म्हणून वर्गीय विश्लेषण पुरेसे नाही. वर्णीय विश्लेषणसुद्धा केले पाहिजे. ते डांगेसाहेबांच्या आदिभारतातील आदिम अवस्थांना उजाळा देणारे नसावे. वर्गीय विश्लेषणाने जे वर्ग, गट शोषित वर्गात येतात ते सुद्धा सामाजिक पातळीवरती शोषकाची भूमिका घेत असतात. या देशातील एकूण लोकसंख्येत ज्यांना उच्चवर्णीय समजले जाते त्यांचे प्रमाण जास्तीत जास्त २० टक्के असेल; परंतु या २० टक्के लोकांनी सर्व क्षेत्रांत ८० टक्के सत्तास्थाने हजारो वर्षांपासून बळकावली आहेत. हजारो वर्षांपासून हे २० टक्के लोक समाजाचे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौतिक इ. सर्व फायदे भोगीत आलेले आहेत. ८० टक्के बहुसंख्य असे मागासवर्गीय दलित + आदिवासी + महिला + अल्पसंख्य) यांना फक्त २० टक्के जागा ठेवलेल्या असतात. ही अफाट विषमता दूर झाल्याशिवाय लोकशाहीला तिच्यासोबत समाजवादी समाजरचनेच्या आंदोलनाला लोहिया म्हणतात त्या प्रमाणे, सामाजिक आधार प्राप्त होणार नाही. केवळ २० टक्केच्या शक्तीवर लोकशाही टिकवणेच काय पण देशाचे अस्तित्वही टिकणे शक्य होणार नाही. ही परिस्थिती सुधारण्यासाठी डॉ. लोहिया म्हणतात त्याही सूचनेचा श्रमिक दलित एकजुटीचे स्वप्न पहाणारे तथाकथित डावे विचार करणारे आहेत काय? जसे 'सत्तास्थानांची आहे त्या सेटपमध्ये लोकशाहीच्या प्रमाणात वाटणी होणे ही आदर्श समानता ठरेल. परंतु व्यवहारात ती तात्काल शक्य नसल्यामुळे दोघांनीही काही प्रमाणात त्याग करावा. म्हणजे २० टक्के वाल्यांनी ४० टक्के जागांवर समाधान मानावे. म्हणजे त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या मानाने दुप्पट जागा मिळतील. ८० टक्के वाल्यांना ६० टक्के जागा मिळतील. कदाचित या सत्ताविभाजनातून संभाव्य समानता जी रुजली जाईल ती आम्हा सर्वच कष्टकऱ्यांना वर्णहीन, वर्गहीन समाज निर्माण करण्याच्या उद्दिष्टांना तात्काळ हातभार तरी लावू शकेल. हा आग्रह केवळ राजकीय, आर्थिक सत्तास्थानांपुरताच असू नये. जे पक्ष दलितोद्धाराचा आदर्श मानतात, त्यांनी आपल्या पक्ष संघटनेत आणि सर्व प्रकारच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडतानाही वरील प्रमाण पाळले पाहिजे. असे होऊ शकले तर आज दलित कष्टकऱ्यांच्या आंदोलनांत नवे चैतन्य निर्माण होईल. देशाला नवे नेतृत्व मिळेल !

आज अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर आपण काम करायला निघालोत ? अशा घोषणा महात्मा फुले सत्यशोधक प्रतिष्ठान, सत्यशोधक कम्युनिस्ट आणि सुधीर बेडेकरांचा 'लोकायती' संप्रदाय करताहेत ही आनंदाची आणि आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांना डोळस होण्याची वेळ होऊ शकेल. परंतु त्यांच्याही बांधिलकीच्या मर्यादा कदाचित ह्या नवीन प्रयोगाला पडू नयेत. कारण ह्या सर्व संस्थांना दलितांच्या चळवळीत ठामपणे प्रविष्ट व्हायचे धैर्य होत नाही. ते एक अतिशहाणे तरी स्वत:ला समजतात किंवा टोकाची तरी भूमिका घेतात किंवा चक्क सर्वोदयवादी होतात. उदारमतवाद्यांना लाजवण्याइतपत. उद्दिष्टपूर्तिसाठी या मंडळींच्या चर्चाच अतितीव्र होतात. त्याने आमच्यासारख्या दलित चळवळीतील सज्ञान व्हायला निघालेल्या कार्यकर्त्यांना फार घाबरायला होते. बाबा आढाव, सुधीर बेडेकरांना शिव्या देत असतात, तर शरद पाटील अजून तिसऱ्याला TARGET करतात. अजून गाडग्याला जुंपी व्हायचीय. आम्ही दलित कार्यकर्ते आंबेडकरांचे सामर्थ्य खांद्यावर घेऊन या नवीन जाणीवांच्या पाठीमागे उभे राहू, पण वरील सर्व दलित श्रमिक एकजुटीचे स्वप्न व्यवहारात उतरविण्यासाठी काम करायला लागले तर ! दलितांच्या अनेक प्रश्नांत अलिकडल्या दशकात डाव्यांनी लक्ष घातले आहे. मग ती वरळी दंगल असो, नामांतराचा प्रश्न असो, गुजरातमधल्या राखीव जागांचा असो एका विशिष्ट लक्ष्मणरेषेच्या पलिकडे ही मंडळी बाहेर येत नाहीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2933
ग्रं. क्र. 23468
विभाग 2
ठाणे (स्थळ प्रत)

कामगार आणि शेतकरी यांच्या चळवळीशी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाते

भाग २

संकलन

स्वतंत्र मजूर पक्ष

१९३६ साल धर्मांतरासंबंधी वादविवाद करण्यात संपले. १९३७ या नवीन वर्षाच्या प्रारंभी भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्याप्रमाणे प्रांतांना स्वायत्तता मिळाल्यामुळे नवीन राजवटीस प्रारंभ होणार होता. होऊ घातलेल्या निवडणुकी-विषयी जिकडे तिकडे उत्सुकतेचे नि स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले होते. प्रत्येक पक्ष निवडणुका लढविण्याची सिद्धता करण्यात गर्क झाला होता. त्या दृष्टीने आंबेडकर-सुद्धा पाऊल टाकीत होते. आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून त्यांनी १९३६ ऑगस्टमध्ये 'स्वतंत्र मजूर पक्ष' नावाचा, एक नवीन राजकीय पक्ष स्थापन केला. त्या पक्षाचा कार्यक्रम विस्तृतपणे मांडणारा एक जाहिरनामा त्यांनी प्रसिद्ध केला. त्यात भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी नि कामगार ह्यांच्या निकडीच्या गरजा नि गाऱ्हाणी मांडली होती.

ह्या जाहिरनाम्यात खालील गोष्टींचे स्पष्टीकरणही करण्यात आले होते. ' नवीन राज्यघटनेत जबाबदार शासनपद्धती पूर्णपणे देण्यात आलेली नाही असे जरी आम्हांस वाटते, तरीसुद्धा ही राज्यघटना राबवावी असा आमच्या पक्षाने निर्णय घेतलेला आहे.'

'आमच्या पक्षाचे असे ठाम मत झाले आहे की, शेतजमिनीचे झालेले तुकडे नि तिच्यावर वाढत्या लोकसंख्येचा पडलेला भार ही खरी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे आहेत. ह्याला उपाय म्हणजे जुने धंदे पुन्हा जोराने चालविणे आणि नवीन सुरू करणे. जनतेची उत्पादनशक्ती व तिची कार्यक्षमता यांची वाढ व्हावी म्हणून तांत्रिक शिक्षणाचे धंदे, आणि जेथे आवश्यक आहे तेथे शासनाच्या मालकीचे नि शासनयंत्रणेखाली चालणारे धंदे सुरू करण्याचा मोठा विस्तृत कार्यक्रम आम्ही हाती घेणार आहोत' अशी पक्षाने घोषणा केली. कुळांना मालकांनी चालविलेल्या पिळवणुकीपासून संरक्षण मिळावे, मालकांनी त्यांना हुसकावून लावू नये म्हणून कुळांना

संरक्षणाचे आश्वासन देण्यात आले होते. ज्याप्रमाणे कामगारांना काही सवलती मिळतात, त्याप्रमाणे योग्य तो फरक करून कुळांनाही त्या देण्यात येतील, असे म्हटले होते.

'कामगारांच्या हिताच्या दृष्टीने कायदे करण्याची शिकस्त करण्यात येईल. नोकऱ्या देणे, बडतर्फ करणे, कारखान्यांत बढती देणे, कामांच्या तासांची कमाल मर्यादा व वेतनश्रेणी, भरपगारी रजा देणे, कामगारांना स्वस्त नि आरोग्यदायक वसतिस्थानाची तरतूद करणे वगैरे बाबतीत कायदे करू. बेकारीपासून मुक्तता व्हावी म्हणून भूमिहीनांना जमिनी देऊन त्यांच्या वसाहती स्थापण्यात येतील. जनहिताची कामे आरंभण्यात येतील. औद्योगिक धंद्यांची केंद्रे, मोठी नगरे, ह्यातून कनिष्ठ–मध्यम वर्गाला घरभाडे कमी पडावे म्हणून तरतूद करण्यात येईल', असे जाहीरनामा काढून आश्वासन दिले.

सामाजिक सुधारणांसंबंधी जाहीरनाम्यात म्हटले होते की, ' स्वतंत्र मजूर पक्ष समाजसुधारकांना साह्य करील. सनातनी नि प्रतिगामी स्वरूपाच्या सर्व शक्तींना आळा घालण्याची अत्यंत आवश्यकता आहे हे पक्षाला पटते. धर्मादाय संस्थेतून राहिलेल्या रकमेचा विनियोग शिक्षणासारख्या निधर्मी कामासाठी करण्यात येईल. खेड्यांतील आरोग्यासाठी नि घरांसाठी खेड्यांची योजना सुरू करू आणि खेड्यांना आधुनिक स्वरूप देऊ. खेड्यांना सभागृहे, वाचनालये आणि 'रोटरी' बोलपट पुरविण्याची सोय करण्यात येईल.

हा जाहिरनामा गरीब आणि दलितवर्ग यांच्या उत्कर्षाच्या नि उद्धाराच्या ध्येयाने प्रेरित झालेला होता. इतका ध्येयपूर्ण, निःसंदिग्ध व जनहिताबद्दल दक्षता दाखविणारा जाहीरनामा तत्कालीन राजकीय पक्षांत क्वचितच सापडेल. म्हणूनच स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यावर मत देताना एका इंग्रजी दैनिकाने स्वाभाविकपणे म्हटले, 'जरी आमचे मत राजकीय पक्षांच्या संख्येत वाढ होऊ नये असे असले तरी, आंबेडकरांनी स्थापिलेला नवा पक्ष ह्या प्रांतातील जीवन समृद्ध करण्याच्या दृष्टीने नि देशाच्या भवितव्याला वळण लावण्याच्या कामी अत्यंत उपयोगी पडेल. अशा पक्षाला वाव आहे आणि त्याची आवश्यकताही आहे. समाजवाद्यांशी सहकार्य करून देशावर धो–धो करीत पसरणाऱ्या साम्यवादाच्या लाटेला थोपवून धरणारी ही एक संरक्षणाची भिंत होईल. जर मतदार संघात खास गट नसते वा वेगवेगळे गट पडले नसते, तर हाच पक्ष थोड्याच कालावधित देशातील एक वजनदार पक्ष म्हणून नावारूपास चढला असता,' हे त्या पत्राचे म्हणणे यथार्थच होते. आणि आंबेडकरां-

मधल्या ज्ञानी पुरुषापेक्षा त्यांच्यातील पक्षसंघटक अधिक प्रभावी झाला असता, तर ह्या संपादक महाशयांच्या आशा फलद्रूप होणे असंभवनीय नव्हते.

निवडणुकीसाठी आपल्या पक्षाची पूर्वतयारी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ११ नोव्हेंबर १९३६ रोजी इटालियन आगबोटीने प्रकृतीस्वास्थ्यासाठी जिनेव्हामार्गे युरोपला गेले. परंतु त्यांचा अंतस्थ हेतू निराळाच होता. अस्पृश्य वर्गाने जर शीख धर्माची दीक्षा घेतली तर नवीन राज्यघटनेप्रमाणे मिळालेल्या तरतूदीस ते मुकतील की कसे ह्याविषयी ते ब्रिटीश मुत्सद्यांचे मत चाचपून पाहणार होते. नवीन राज्यघटनेप्रमाणे सार्वत्रिक निवडणूक अगदी तोंडावर आली असता ते गुपचूप इंग्लंडला निघून जातात, ह्याचा अर्थ वर म्हटल्याप्रमाणेच असावा असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

युरोपला निघण्यापूर्वी त्यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्राला मुलाखत दिली होती. त्यावेळी ते म्हणाले, 'काँग्रेस ही पिळवणूक करणाऱ्यांची आणि पिळल्या जाणाऱ्यांची झालेली एकजूट आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ह्या जुटीची आवश्यकता असेल. परंतु राष्ट्राच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने ती अत्यंत निरुपयोगी आहे.' आपल्या स्वतंत्र मजूर पक्षाविषयी ते म्हणाले, 'तो पक्ष जनतेला लोकशाहीचे तंत्र आणि पद्धत यांचे शिक्षण देईल. त्याच्यापुढे योग्य अशी मतप्रणाली ठेवील आणि विधिमंडळातून राजकीय प्रगतीसाठी तो त्यांची संघटना करील.' पक्षातील सर्व सहकारी आणि नेते डॉ. आंबेडकरांना निरोप देण्यासाठी धक्क्यावर उपस्थित होते.

आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेचे फार दूरवर पडसाद उमटत होते. त्यामुळे स्पृश्य हिंदूंच्या सामाजिक आत्म्यास जाग येऊ लागली. आपण अस्पृश्य हिंदूंवर शतकानुशतके करीत असलेल्या अन्यायाची त्यांना जाणीव होऊ लागली. अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी भारतात मोठे प्रयत्न करण्याची तयारी होत होती. थोडयाच दिवसांपूर्वी म्हैसूर सरकारने एक राजाज्ञा काढून अस्पृश्यांना दसऱ्याच्या दिवशी दरबारात साजऱ्या होणाऱ्या उत्सव समारंभात भाग घेण्यास संमती दिली. म्हैसूर सरकारच्या इतिहासात अपूर्व अशी ही घटना होती. त्या घोषणेच्या पाठोपाठ त्रावणकोर सरकारने आपल्या ताब्यात असलेली जवळजवळ १६०० देवळे एका जाहिरनाम्यान्वये अस्पृश्यवर्गास खुली केली. त्या जाहिरनाम्यामुळे खरोखरीच भारताच्या आणि हिंदुधर्माच्या इतिहासात एक नवीन पर्व सुरू झाले असे म्हणणे यथार्थ होईल. भारताच्या चारी दिशा त्रावणकोरच्या महाराजांचे धैर्य, दूरदृष्टी व शहाणपणा ह्यासंबंधीच्या गौरवोद्गारांनी दुमदुमून गेल्या. ह्या घटनेच्या पाठीमागे सर सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांचा मुत्सद्दी-

पणा असल्यामुळे त्यांचीही देशभर वाहवा झाली. इंग्लंडमधील 'मँचेस्टर गार्डियन' ह्या वृत्तपत्राने तर सर रामस्वामी अय्यर यांची पाठ थोपटली आणि लोकशाहीच्या जीवनाला मार्गदर्शक अशीच रामस्वामींनी घडवलेली ही घटना आहे असा ह्या वृत्तपत्राने निर्वाळा दिला. एम. सी. राजा ह्या नेत्याने असे म्हटले की, ही घोषणा पुणे करारातील तत्त्वांची आणि उद्दिष्टांची फलश्रुतीच होय. त्रावणकोर सरकारची घोषणा ही एक मुत्सद्दीपणाची दर्शक अशी घटना आहे असा मद्रास येथील 'हिंदू' दैनिकाने आपला अभिप्राय व्यक्त केला.

ह्या घटनेचा परिणाम पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या मनावरही झाला. हिंदू हे हिंदुस्थानांत बहुसंख्य राहिले काय किंवा धर्मांतरामुळे गळती लागून अल्पसंख्य झाले काय, ह्याविषयी सर्वथैव उदासीन असणारे आणि भारतातील सर्व पूजास्थानेच दोन-तीन पिढ्यांपर्यंत बंद करून टाकावीत, असे वैतागाने विचार व्यक्त करणारे पंडित जवाहरलाल नेहरू[१] ह्या घटनेमुळे घटकाभर भारावून गेले. त्रावणकोरच्या जाहीरनाम्याविषयी बोलताना त्यांनी असे विचार व्यक्त केले की, 'अस्पृश्यांचा प्रश्न हा मुळातच भूमिहीन वर्गाचा आर्थिक प्रश्न आहे. ह्या जाहीरनाम्यामुळे जे नवीन वातावरण निर्माण झाले आहे ते लोकांच्या मनावर दूरवर परिणाम घडवून आणील. त्यामुळे अस्पृश्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्यास साहाय्य होईल, असे मला वाटते.'[२] हिंदुमहासभेने ग्वाल्हेर आणि इंदूर येथील महाराजांना त्रावणकोरच्या महाराजांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांनी अस्पृश्यांना देवळे खुली करावी, अशी विनंती केली.

'त्रावणकोरच्या ह्या घोषणेचा धर्मांतराच्या घोषणेशी संबंधच नसेल, असे आपल्याला वाटत नाही,' असे 'बॉंबे क्रॉनिकल'ने आपले मत दिले ते योग्यच होते. 'हिंदू हेराल्ड'सारखी वर्तमानपत्रे स्पष्टपणे म्हणाली की, 'जर त्रावणकोरची घोषणा स्वयंस्फूर्त असती तर ती ह्या पूर्वीच करण्यात आली असती.' अस्पृश्यांच्या अविरत झगडचांमुळे आणि त्यांनी घातलेल्या निर्वाणीच्या अटींमुळे अशी घोषणा करण्यास महाराजांस भाग पडले, असे आपले मत 'हिंदू हेराल्ड' ने दिले. खरे म्हणजे हिंदू संस्थानिकांची बुद्धी ही एका पुरुषाच्या प्रचंड कर्तृत्वामुळे क्रियाशील झाली आणि तो पुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. हे सत्य जरी अनेक हिंदी वृत्तपत्रांनी झाकून ठेवले तरी ते सूर्यप्रकाशाइतके सत्य होते. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेचा परिपाक म्हणजे त्रावणकोरची घोषणा होय.

---

१. The Times of India, 28 October 1941
२. The Hindu Herald, 20 November 1936

आंबेडकर प्रकृतिस्वास्थ्यासाठी बराच काळ व्हिएन्ना आणि बर्लिन येथेच राहिले. मात्र एक आठवडाभर ते लंडनला राहिले होते. ते लंडनमध्ये असताना, मुंबई येथील 'विविधवृत्त' ह्या सुप्रसिद्ध साप्ताहिकाच्या लंडन येथील प्रतिनिधीने अशी बातमी दिली की, आंबेडकर यांनी एका इंग्रज बाईशी लग्न केले असून ते १४ जानेवारी १९३७ रोजी तिला घेऊन मुंबईस येत आहेत. आंबेडकर आणि 'विविध-वृत्ता'चे संपादक रामभाऊ तटणीस ह्यांचे स्नेहसंबंध लक्षात घेता ती बातमी म्हणजे वृत्तपत्रातील एक शुद्ध लोणकढी थापच होती असे म्हणणे योग्य होणार नाही. थोर राजकारणी पुरुषांच्या लग्नाच्या बातमीने अनेक वेळा जगातील बातमीपत्रे थरारून जातात. असे अनेकदा घडते की, पराक्रमी पुरुषांच्या कर्तृत्वामुळे वा प्रतिभेमुळे त्यांच्याकडे स्त्रिया आकृष्ट होतात. त्या काळी अशी एक अफवा होती की, एक इंग्रज बाई आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वावर भाळली होती. तिने त्यांच्याशी लग्न करण्याचा हट्ट धरला होता. अशा तऱ्हेचा विवाह बाबासाहेबांनी केला असता, तरी त्यांच्या अढळ स्थानाला कोणत्याही तऱ्हेने धक्का लागला नसता. खोजा समाजाला जसे आगाखान वंदनीय तसेच अस्पृश्यवर्गाला आंबेडकर. १४ जानेवारी १९३७ रोजी आंबेडकर मुंबईस परत आले. बोटीवरून उतरत असता त्यांच्या लग्नासंबंधी काही वार्ताहरांनी त्यांना हटकलेच. ती बातमी अगदी निराधार होती असे सांगून ते पुढे म्हणाले, ' मला असे चोरून लग्न करण्याची काही आवश्यकता नाही.' लंडनमध्ये असताना आपण राजकीय स्वरूपाच्या गाठीभेटी घेतल्या नाहीत असेही त्यांनी सांगितले. धर्मांतराविषयी विचारताच ते हसून म्हणाले, ' माझा धर्मांतराचा निश्चय अढळ आहे. परंतु कोणता धर्म स्वीकारायचा ह्याविषयी मी अद्याप निर्णय घेतलेला नाही. मुंबई विधीमंडळासाठी होणाऱ्या नवीन निवडणुका लढविणे हेच आमचे सध्याचे निकडीचे कार्य आहे.'

धक्क्यावर त्यांचे नेहमीप्रमाणे भव्य स्वागत करण्यात आले. बाबासाहेबांची इंग्रज पत्नी पाहण्यास उत्सुक असलेला तो त्यांच्या भक्तांचा अफाट जनसमुदाय रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दाटीवाटीने उभा होता. बाबासाहेबांना एकटेच पाहून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. आठव्या एडवर्डच्या विवाहामुळे निर्माण झालेल्या प्रश्नात ब्रिटीश मुत्सद्दी गुंतले होते. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या प्रश्नांसंबंधी चर्चा करावयास त्यांना सवड नव्हती, असे वाटते. 'गोलमेज परिषदेच्या वेळी तुम्ही मांडलेली अस्पृश्यांची गाऱ्हाणी आम्ही ऐकलेली आहेत. जे काही करावयाचे ते आम्ही त्या वेळीच केले आहे,' असेच त्यांनी आंबेडकरांना सांगितले असावे. ब्रिटीश मुत्सद्द्यांशी चर्चा करण्यापूर्वी आंबेडकरांनी काही विख्यात जर्मन निर्बंधपंडित आणि नाणावलेले इतर

युरोपियन निर्बंधपंडित ह्यांच्याशी चर्चा केली. अस्पृश्यांनी शीख धर्म स्वीकारला तर त्यांना मिळालेल्या प्रांतिक विधिमंडळातील राखीव जागा राहतील किंवा जातील ह्याविषयी चर्चा झाली. कारण शीखांना राखीव जागा फक्त पंजाबमध्येच ठेवलेल्या होत्या. पुढे असे झाले की, शीख मिशनचे नेते व आंबेडकर ह्यांच्यामध्ये मतभेद होऊन ते एकमेकांपासून दुरावले आणि शीख धर्म स्वीकारण्याचा प्रश्न त्या मतभेदाच्या हवेतच विरला.

मुंबईस आल्याबरोबर आंबेडकरांनी आपल्या पक्षाच्या निवडणूक प्रचाराची मोहीम सुरू केली. निवडणुकीचा दिवस जवळ येत होता. एक महिन्याने निवडणूक होणार आणि निर्णय लागणार. भारतातील सर्वात बलाढ्य अशा काँग्रेस पक्षाशी आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाला टक्कर द्यावयाची होती. काँग्रेस पक्षाच्या मुखाभोवती देशभक्तीच्या त्यागाचे जणू वलयच होते. कार्यकर्ते आणि पैसा यांनी काँग्रेस पक्ष अगदी समृद्ध होता. ज्या आंबेडकरांनी दलित वर्गाच्या अखिल भारतीय परिषदेचे अनेक वेळा अध्यक्षपद स्वीकारून मार्गदर्शन केले आणि ज्या मूक जनतेच्या दुःखांना वाचा फोडली, त्या आंबेडकरांना निवडणुका लढविण्यासाठी एखादा अखिल भारतीय स्वरूपाचा नवीन पक्ष स्थापन करता आला नाही, ह्याविषयी आश्चर्य वाटते. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य मुंबई प्रांतापुरतेच मर्यादित राहावयाचे होते.

उशीरा का होईना, पण आंबेडकरांनी निवडणूक प्रचारास आरंभ केला. आपली नवीन भूमिका त्यांना लोकांपुढे स्पष्ट करावी लागली. आपण नवा पक्ष का काढला ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी असे दिले की, 'प्रांतिक विधिमंडळातील १७५ जागांपैकी फक्त १५ जागा राखीव होत्या. विरोधी पक्षाच्या स्थापनेसाठी १५ सभासद अपुरे पडतात हे अगदी उघड आहे. म्हणून ज्या स्पृश्य हिंदू सहकाऱ्यांनी दलितांच्या झगड्यांत कष्ट आणि दुःख भोगून साहाय्य केले, त्यांच्याशी चर्चा करून सर्वांना खुल्या असलेल्या जागांसाठी दुसरे काही उमेदवार उभे करावे असे मीच ठरविले.' ह्यामुळे त्यांचा दुहेरी हेतू सिद्ध झाला. एक असा की, आपल्या सहकाऱ्यांची सदिच्छा ते राखू शकले आणि दुसरा असा की राखीव जागेसाठी उभ्या केलेल्या उमेदवारांना स्पृश्य हिंदूंकडून अधिक मते मिळण्याचा संभव बळावला. कारण स्पृश्य हिंदूंची मते राखीव जागांच्या निवडणुकीत काही कमी परिणामकारक नव्हती. शिवाय अधिक जागा मिळविण्यात ह्या पक्षाचा उपयोग होणार होता. आंबेडकरांनी काही स्वतंत्र उमेदवारांनाही पाठिंबा दिला होता. आंबेडकरांच्या पक्षाच्या कार्याचे क्षितिज विस्तारले होते.

मुंबई प्रांतातील सर्व जिल्ह्यांतून आंबेडकरांनी धावता प्रचार केला. नाशिक, अहमदनगर, खानदेशातील काही प्रमुख गावे, सोलापूर, सातारा ह्या ठिकाणी, आंबेडकरांनी छोटी छोटी भाषणे केली. सातऱ्याला दिलेल्या भेटीत आपल्या आईच्या समाधीला अश्रूंनी भरलेल्या नयनांनी पुष्पहार घातला. आपल्या पक्षाच्या तिकीटावर उभे असलेले रोहम यांना आपल्या अनुयायांनी निवडून दिले पाहिजे, असे त्यांनी नगर येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या जिल्हा परिषदेत आवाहन केले. रोहम यांची योग्यता किंवा गुण ह्यांविषयी अस्पृश्य वर्गाने उगाच विचार करू नये. आपल्या अंगी शेकडो पदवीधरांची बुद्धी नि शक्ती असल्यामुळे विधिमंडळात आपल्या पक्षातील सभासदांना योग्य ते मार्गदर्शन आपण करू शकतो असे त्यांनी छातीठोकपणे सांगितले. पनवेल व महाड येथील सभांतून त्यांनी अशीच प्रभावी भाषणे केली. या निवडणूक मोहिमेतील एक वशिष्ट्य म्हणजे आंबेडकरांनी लोकशाही स्वराज्य पक्षाचे नेते लक्ष्मण बळवंत भोपटकर ह्यांना दिलेला पाठिंबा. पुण्यातील अस्पृश्यांची मते आपल्याला देण्याविषयी सांगण्यात यावे अशी भोपटकरांनी आंबेडकरांना विनंती केली होती. आंबेडकरांची सहानुभूती मिळविणे ही सोपी गोष्ट नव्हती. जरी भोपटकर हे सनातनी आणि प्रतिगामी लोकांनी पाठिंबा दिलेल्या पक्षाचे होते, तरी भोपटकरांचे उत्तम गुण आणि प्रामाणिक हेतू यांची आंबेडकरांना माहिती होती. कारण भोपटकरांनी अस्पृश्यांच्या कार्याची आणि प्रश्नांची तळी उचलून धरलेली होती. भोपटकरांना साह्य करण्यात आंबेडकरांचा दुसरा एक हेतू होता. तो असा की, भोपटकरांच्या पक्षाचा नवीन राज्य-घटना राबविण्याचा निर्धार अढळ होता आणि विधिमंडळात काम करण्याची सिद्धता आणि नवीन राज्यघटना राबविण्याचा निर्धार यांविषयी दणकेबाज प्रचार भोपटकरांचे पक्षनेते न. चि. केळकर करीत होते. त्यासाठी केळकर-भोपटकरांनी आपले काँग्रेसमधील भूतपूर्व सहकारी आणि काँग्रेसनिष्ठ वृत्तपत्रे यांच्या हातून टीकेचा आणि निंदेचा अनेक वर्षे भडिमार सहन केला होता. म्हणून भोपट-करांच्या उमेदवारीला मनःपूर्वक पाठिंबा देऊन आंबेडकरांनी त्यांना यश चिंतीले. आपल्या परीने केळकरांनीही एक पत्रक काढून आपल्या मतांच्या मुंबईतील लोकांनी आंबेडकरांना मते द्यावीत अशी प्रकट विनंती केली. नेहमी तोलून शब्द वापरणारे साहित्यसम्राट केळकर ह्यांनी आपल्या पत्रकात 'आंबेडकर हे दलितांचे अनभिषिक्त राजे आहेत.' असा गौरव केला. केळकर पुढे म्हणाले, 'आंबेडकरांनी आपले उच्च स्थान आपल्या बुद्धिमत्तेने, ध्येयनिष्ठेने आणि अविरत झगड्याने प्राप्त करून घेतले आहे.' केळकरांनी सातवळेकरांना परस्पर उत्तर दिले.

पुणेकर ब्राह्मणांना निवडणुकीमध्ये अस्पृश्य वर्गीयांनी पाठिंबा द्यावा, हे ' वदतो व्याघात ' असेच म्हणावे लागेल. खरोखर राजकारणात कोण कोणाचा

केव्हा सहकारी होईल याचा नेम नसतो. आंबेडकरांची आणि पुणेरी ब्राह्मणांची युती झाल्याचे पाहून मुंबईतील विख्यात कामगार नेते ना. म. जोशी ह्यांची हसता हसता मुरकुंडी वळली. ते आंबेडकरांना म्हणाले, 'अहो, ह्या युतीमुळे तुमचे गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले.' त्यावर आंबेडकर तितक्याच जोषात म्हणाले, 'गेले तर गेले. पण काम तर झाले !' सार्वत्रिक निवडणुका होण्यापूर्वी एक खळबळ उडविणारी बातमी सिंधमध्ये पसरली. शेख मस्जीद या मुसलमान झालेल्या हिंदूने आपले प्रतिस्पर्धी सर शहानवाजखान भुत्तो यांच्या विरूद्ध आपल्याला मते मिळावी म्हणून एक खोटी बातमी पसरविली. जर माझ्यासारख्या मुसलमान झालेल्या हिंदूस मुसलमानांनी आपला शब्द पाळून मते दिली तर आंबेडकर धर्मांतरासाठी मुसलमान धर्म निवडतील, अशी शेख मस्जीदने कंडी पिकविली. सर शहानवाजखान भुत्तो ह्यांनी तारेने आंबेडकरांकडे चौकशी करताच, आंबेडकरांनी त्यांना उलट तारेने उत्तर धाडले की, 'आम्ही मुसलमान होऊ अशा तऱ्हेचे वचन शेख मस्जीद किंवा अन्य कोणाला मी दिलेले नाही. शेख मस्जीदने ही खोटीच अफवा उठविलेली आहे. त्याचे म्हणणे धादांत खोटे आहे.'

काँग्रेस पक्षाने सर्व प्रांतांत निवडणुकीसाठी आपले उमेदवार उभे केले. परंतु काँग्रेस नेत्यांनी दोन जागा आपली सर्व शक्ती पणास लावून मोठ्या हिरीरीने लढवल्या. त्यासाठी त्यांनी सर्व साधने आणि युक्त्या व डावपेच योजिले. त्या दोन जागा म्हणजे मुंबईत आंबेडकर लढवीत असलेली जागा आणि दुसरी ल. ब. भोपटकर लढवीत असलेली पुण्यातील जागा. आंबेडकर तर काँग्रसचे कठोर आणि कडवे शत्रू. काँग्रेसचे नेते आणि काँग्रेसची ध्येय धोरणे यांचा मनापासून तिटकारा करणारे. भोपटकर हे एका काळचे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष. त्यांनी काँग्रेसच्या नेत्यांसंगे ब्रिटीश सत्तेच्या विरुद्ध झुंज केलेली. परंतु युद्ध सुरू झाले की, समोर कोण आहे ते पाहतो कोण ? काँग्रेसने क्रिकेटपटू बाळू बाबाजी पालवणकर ह्यांना आंबेडकरांच्या विरूद्ध आपला उमेदवार म्हणून उभे केले. शिवाय पां. न. राजभोज आणि देवरूखकर ह्यांना आंबेडकरांची मते फोडण्यासाठी निवडणुकीत उतरविले. सार्वत्रिक निवडणुका १७ फेब्रुवारी १९३७ ला झाल्या. निवडणुकीच्या निकालात काँग्रेसपक्षीय पालवणकरांचा सपशेल पराभव झाला. राजभोज आणि देवरुखकर यांचा पराभवाच्या ढिगाऱ्यात पत्ताही लागला नाही. आंबेडकरांचा प्रचंड मतांनी विजय झाला. भोपटकर विरश्रीने लढले. पण निवडणुकीत हरले. नवीन राज्यघटनेप्रमाणे झालेल्या ह्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने घवघवीत यश संपादिले. त्यांच्या १७ उमेदवारांपैकी १३ यशस्वी झाले. आता आंबेडकर नि कांग्रेस पक्ष यांच्यामध्ये विधिमंडळात लढत रंगेल असे विचारवंतांना वाटू लागले. कारण काँग्रेसच्या काही

छांदिष्ट आणि पक्षपाती मतांच्या चिंधड्या उडविणारे म्हणून आंबेडकर प्रसिद्ध होते. त्यांच्या जालीम टीकेची त्यांना भीती वाटत असे.

आपल्या एकमेव नेत्याच्या विजयामुळे मुंबई प्रांतातल्या अस्पृश्य जनांचा आनंद गगनात मावेना. त्यांच्या आनंदाच्या लाटा महाराष्ट्रातील त्यांच्या सर्व वस्त्यांमधून घोंगावत गेल्या. सांगली येथील त्यांच्या वस्तीमध्ये आंबेडकरांचा भव्य सत्कार झाला. त्या सत्कारात अभिमानाने नि आनंदाने भाग घेण्यासाठी आजूबाजूच्या खेड्यांतील आणि शहरांतील अस्पृश्य जनतेचा प्रचंड जनसमुदाय लोटला होता.

निवडणुकीतील घवघवीत विजयाचा आनंद त्यांनी मिळविलेल्या दुसऱ्या एका विजयाने द्विगुणित झाला. महाड येथील चवदार तळ्यासंबंधी प्रतिवाद्यांनी मुंबई येथील उच्च न्यायालयात आणलेल्या दाव्याचा निर्णय दिनांक १६ मार्च १९३७ ला लागला. ठाणे येथील सहाय्यक न्यायाधिशाने दिलेला निर्णय कायम झाला. आंबेडकरांनी आपले बोल खरे केले. तळ्याचा लढा जिंकला. चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा अस्पृश्यांचा हक्क प्रस्थापित झाला.

सार्वत्रिक निवडणुकीमध्ये काँग्रेसने सर्व प्रांतात विजय मिळविला. परंतु मंत्रिमंडळ स्थापन करण्यास त्यांनी नकार दिला. विधिमंडळात जाणे हराम आहे, असे म्हणणारे काँग्रस कार्यकर्ते विधिमंडळाच्या उंबरठ्यापाशी उत्सुकतेने पण शिस्तीने उभे राहिले. काँग्रस पक्षाने मंत्रिमंडळ स्थापण्याचे नाकारल्यामुळे, मुंबई प्रांतात सर धनजीशहा कूपर आणि जमनादास मेथा ह्यांनी मंत्रिमंडळ बनविले. मुंबई विधिमंडळातील काँग्रेसचे प्रमुख नेते बाळ गंगाधर खेर ह्यांनी कूपर मंडळावर जो अविश्वासाचा ठराव आणला होता त्यावर सही करण्यास आंबेडकरांना विनंती केली. आंबेडकर त्यावेळी जंजीरा संस्थानमध्ये काही कामानिमित्त गेले होते. तेथून त्यांनी खेरांना उत्तर धाडले. त्यात ते म्हणाले, ' काँग्रेस पक्षाच्या ह्या मागणीत स्वतःच्या पक्षाची प्रतिष्ठा वाढविण्यापलिकडे दुसरे काही नाही. राज्यपालांना विधिमंडळ सहा महिन्यांच्या अवधीत बोलवावे लागणारच आहे. त्यावेळी काँग्रेस आमदारांना आपले म्हणणे मांडता येईलच.'

पुढे लवकरच आंबेडकरांनी नवीन राज्यघटना राबविण्यासंबंधी आपले विचार मुंबईतील कामगार मैदानावर आपल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभेत पुन्हा स्पष्टपणे जाहीर केले. दलित वर्गाच्या हिताच्या दृष्टीने जे काही मिळेल ते त्या राज्यघटनेपासून मिळवावे असा निर्धार त्यांनी प्रकट केला. काँग्रेस पक्षाने प्रामाणिकपणे

विधिमंडळावरील बहिष्कार उठवावा अशी त्यांना चेतावणी देऊन ते म्हणाले, 'ब्रिटीश सत्तेशी काँग्रेस पक्षाचा चाललेला लढा संपेपर्यंत आमची दु:खे नि गाऱ्हाणी तशीच चालू रहावीत असे आम्हाला वाटत नाही.' आपल्या भाषणात त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू आदी काँग्रेस नेत्यांनी अस्पृश्यांच्या राखीव जागेसाठी शागीर्द उभे करावे ह्या वृत्तीचा कडकडीत निषेध केला. हरी नावाचा नेहरूंचा अस्पृश्यवर्गीय नोकर होता. तोच नेहरूंनी निवडणुकीसाठी उभा करून त्याला निवडून आणले होते. गंमत कशी आहे पाहा ! बेळगावला आंबेडकर म्हणाले, ' रोहमची योग्यता किंवा गुण पाहू नका. माझ्या कर्तृत्वाकडे पाहा. ' नेहरूंनीही तेच म्हटले असावे. आपण कूपर मंत्रिमंडळात का सामील झालो नाही ह्याविषयी खुलासा करताना आंबेडकर म्हणाले, ' ज्या मंत्रिमंडळाला विधिमंडळात बहुमत नाही, त्या मंत्रिमंडळात मंत्रिपद स्वीकारणे काय कामाचे ? ते मंत्रिमंडळ फार दिवस टिकणार नाही. '

शेवटी हो ना करता करता काँग्रेस पक्षाने आपली स्वत:ची खात्री करून घेऊन १९ जुलै १९३७ रोजी मंत्रिमडळ बनविले. एक दिवस अगोदर हंगामी कूपर मंत्रिमंडळाने राजीनामा दिला. ब्रिटीश राज्याशी निष्ठेने वागण्याची शपथ काँग्रेस आमदारांनी ' अनौपचारिक'रीत्या का होईना पण घेतली आणि ते विधिमंडळातील खुर्च्यांवर विराजमान झाले. गीता हातात घेऊन शपथविधी न करता, आंबेडकरांनी शपथविधी उरकला.

मुंबई विधिमंडळात विरोधी गटात आंबेडकर नि जमनादास मेथा हे दोन चतुर आणि विख्यात वादविवादपटु होते. भारतातील कुठल्याही विधिमंडळात त्यांच्या तोडीचे नि दराऱ्याचे आमदार नव्हते. जगातील कुठल्याही विधिमंडळात त्यांचा दरारा बसला असता. त्या मानाने काँग्रेस पक्षातील बहुतेक आमदार नवशिके, अनभिज्ञ होते. विधिमंडळात जाणे हराम आहे, अशी ज्यांनी अनेक वर्षे शेखी मिरविली त्यांनीच आता ब्रिटीश सत्तेला शह देण्यासाठी मंत्रिमंडळे स्वीकारली. काँग्रेस आता केळकर, आंबेडकर, जयकर यांच्या विचारसरणीच्या रूळावर सध्या तरी आली. ब्रिटीश सत्तेला आतून आणि बाहेरून टक्कर देणे योग्य त्या निर्णयावर काही वर्षे तरी काँग्रेस नेते स्थिरावले.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
2933
वा. क्र. 23468
निबंध 2/0152
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

कामगार चळवळ आणि तिच्याशी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाते

काँग्रेस पक्षाने आपले मंत्रिमंडळ बनविले. तथापि, मुसलमान-मतदार संघात त्या पक्षाचा धुव्वा उडाल्यामुळे मंत्रिमंडळाचा दत्तक घेण्यासाठी एखादा मुसलमान आमदार मिळतो की काय याच्या शोधात ते होते. त्या वेळी संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रश्न उद्‌भवला नव्हता. आंबेडकरांचाही संमिश्र मंत्रिमंडळ बनविण्याच्या धोरणावर विश्वास नव्हता. तशी मंडळे क्वचितच प्रसंगी बनवायची असतात असे त्यांचे मत होते.

३१ जुलै १९३७ रोजी आंबेडकर न्यायालयाच्या कामासंबंधी धुळ्याला जात होते. त्या वेळी चाळीसगाव येथे स्थानकावर पहाटेस अस्पृश्य जनतेने त्यांचा प्रचंड जयजयकारात सत्कार केला. 'आंबेडकर कोण आहेत ?' आंबेडकर आमचे बादशहा आहेत.' अशा नवीन घोषणेने त्यांचे प्रचंड स्वागत झाले. चाळीसगाव येथील उतारू बंगल्याकडे मिरवणुकीने त्यांना नेण्यांत आले. न्यायालयातील काम संपल्यावर तिसऱ्या प्रहरी हरिजन सेवक संघाचे नेते बर्वे यांनी आंबेडकरांच्या सन्मानार्थ चहापानाचा समारंभ घडवून आणला. सायंकाळी विजयानंद नाटचगृहामध्ये एका सभेत आंबेडकरांनी भाषण केले. आपल्या भाषणात आंबेडकर म्हणाले, 'आपल्या समाजाच्या हिताकडे कानाडोळा करणाऱ्या ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या जागी सामाजिक जीवनात आपल्याला छळणाऱ्या पक्षाचे प्रतिनिधी आता आरूढ झालेले आहेत. अस्पृश्यांच्या हिताच्या दृष्टीने हे दिवस संघटित होऊन सावधपणे पावले टाकण्याचे आहेत. काँग्रेसनिर्मित मंत्रिमंडळामार्फत ब्राह्मणी धर्म आपले घोडे कसे पुढे दामटित आहे पहा. काँग्रेस-निर्मित सर्व मंत्रिमंडळांचे नेते ब्राह्मण आहेत. अस्पृश्य वर्गीय एकही मंत्री त्यांच्या कुठल्याही मंत्रिमंडळात नाही.

स्वतंत्र मजूर पक्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा नागपाडा नेबरहूड हाऊस, मुंबई येथे ७ ऑगस्ट १९३७ रोजी भरली. आंबेडकरांना कोषाध्यक्ष व अध्यक्ष निवडण्यात आले. म. बा. समर्थ यांना प्रमुख कार्यवाह म्हणून निवडण्यात आले. कमलाकांत

चित्रे, व शां. अ. उपशाम यांना कार्यवाह आणि कमलाकांत चित्रे यांना हंगामी संघटक म्हणून निवडण्यात आले. आंबेडकरांच्या निकटवर्ती मंडळात कमलाकांत चित्रे हे प्रमुख होते. ह्या सर्वसाधारण सभेत बोलताना आंबेडकर म्हणाले, 'प्रत्येक प्रांतातील मंत्रिमंडळात दलित वर्गाचा एक प्रतिनिधी असावा, असा ठराव मांडण्याचे आपणास गोलमेज परिषदेच्या वेळी सुचले नाही हे खरे.'

मंत्र्यांचा पगार दर महिना ५०० रुपये असावा, शिवाय घरभाडे आणि प्रवास-भत्ता मिळावा, याविषयी ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात एक विधियक विधिमंडळा-पुढे चर्चेसाठी आले. आंबेडकर अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी उपस्थित नव्हते. परंतु त्यांनी आता या वेतन विधेयकाला कसून विरोध केला. त्या विधेयकावर टीका करताना आंबेडकर म्हणाले, " मंत्र्यांच्या मासिक वेतनाचा विचार करतेवेळी चार दृष्टींनी आपण त्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे सामाजिक दर्जा, दुसरी गोष्ट म्हणजे कार्यक्षमता, तिसरी लोकशाही व चवथी राज्यकारभाराची सचोटी आणि पावित्र्य. राज्याच्या तीन घटकांपैकी मंत्रिमंडळ हे प्रमुख अंग होय; ते बुद्धिस्थान होय. ५०० रु. मासिक वेतन हे कर्तृत्ववान लोकांना क्षुल्लक वाटून ते दुसऱ्या व्यवसायाकडे वळतील. त्याचा परिणाम असा होईल की, जे पैशाची विशेष चिंता बाळगीत नाहीत, पण सत्तेचा अभिलाष विशेष बाळगतात, असे लोक राज्यसत्ता बळकावून बसतील. मासिक वेतन देशातील राहणीमानाला धरून जर ठेवायचे असेल तर, काँग्रेस मंत्र्यांना या सभागृहात सुचविल्याप्रमाणे फक्त पाऊणशे रुपये मासिक वेतन द्यावे लागेल. देशभक्ती हे बदमाषांचे अंतिम आश्रयस्थान असते असे डॉ. जॉन्सनचे मत होते. परंतु मी म्हणेन ते राजकारणी पुरुषांचेसुद्धा अंतिम आश्रयस्थान असते." विधेयकावरील चर्चेला उत्तर देतेवेळी मुख्यमंत्री खेर म्हणाले, मातृभूमीची सेवा हे या विधेयकातील अभिप्रेत तत्त्व आहे. देशभक्ती हे बदमाषांचे अंतिम आश्रय-स्थान असले तरी सन्मान्य गृहस्थांचे ते आद्य आश्रयस्थान असते." आपल्या भाषेला नामदार खेर यांनी, बाबासाहेबांनी निःस्वार्थ बुद्धीने केलेल्या दलितांच्या सेवेची त्यांना आठवण करून देऊन, आंबेडकरांनी जशी दलितांची सेवा केली तशीच देशाचीही निःस्वार्थ बुद्धीने सेवा करावी असे त्यांना आवाहन केले.

आंबेडकर आपल्या पक्षाचा प्रचार धुमधडाक्याने करीत होते. सप्टेंबर १९३७ च्या आरंभी दलित वर्गाने मसूर येथे भरलेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना त्यांनी सांगितले की, "गांधींच्या हातून कामगार आणि दलित वर्ग यांचे हित होणार नाही, असे आपले ठाम मत झाले आहे. जर काँग्रेस ही क्रांति-

कारक संस्था असती, तर काँग्रेसमध्ये आपण गेलो असतो. परंतु मी तुम्हास खात्रीने सांगतो की, कांग्रेस ही क्रांतिकारक संस्था नाही. सामान्य मनुष्याला आपल्या आवडीनुसार आपला उत्कर्ष करण्यास संधी आणि स्वातंत्र्य देईल असे सामाजिक आणि आर्थिक समतेचे ध्येय काँग्रेस जाहीर करण्यास धजत नाही. जोपर्यंत उत्पादनाची साधने थोड्या व्यक्ती आपल्या स्वार्थासाठी राबवीत आहेत, तोर्यंत सामान्य माणसाला उत्कर्षाची आशा नाही. गांधीवादाच्या तत्त्वाप्रमाणे पाहिले तर शेतकरी हा शेतातील जणू तिसरा बैलच होईल. नांगराच्या दोन बैलांबरोबर तोही एक तसाच निर्बुद्ध आणि कष्टमय जीवनाचा एक प्रतीक ठरेल. ''

कम्युनिस्टांनी चालविलेल्या कामगार चळवळीसंबंधी ते म्णाले, '' मी कम्युनिस्टांशी संबंध ठेवणे सुतराम शक्य नाही. मी कम्युनिस्टांचा कट्टर वैरी आहे.'' कम्युनिस्ट हे आपल्या राजकीय ध्येयसिद्धीसाठी कामगारांना राबवीत असतात, असे त्यांचे ठाम मत होते.

अनेक अडचणींना तोंड देऊन, जीवन कंठीत असलेल्या शेतकऱ्यांचे हित करण्यासाठी आंबेडकर आपली शिकस्त करीत होते. कोकणातील खोती नष्ट करण्यासाठी त्यांनी मुंबई विधिमंडळासमोर १७ सप्टेंबर १९३७ रोजी एक विधेयक मांडले. शेतजमीन कसणाऱ्या कुळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने प्रांतिक मंडळाच्या ह्या नवीन मनूत आंबेडकर हे अशा तऱ्हेचे विधेयक मांडणारे विधिमंडळाचे पहिलेच सदस्य होते. खोती नष्ट होऊन कुळांना जमिनीचे स्वामित्व मिळावे, हा त्यांच्या ह्या विधेयकाचा मुख्य हेतू होता. खोतांचे स्वामित्व नष्ट झाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई त्यांस योग्य ती रक्कम देऊन करावी व कुळांच्या ताब्यात असलेली जमीन रयतवारी पद्धतीप्रमाणे त्यांच्याच मालकीची व्हावी असा त्यांचा हेतू होता. परंतु राज्यकर्त्यांनी हा प्रश्न रेंगाळत ठेवल्यामुळे आंबेडकर त्या विधेयकाला चालना देऊ शकले नाहीत. आंबेडकरांनी महार वतनाचे उच्चाटन करण्यासाठी ह्या वेळीही एक विधेयक मांडले. त्याच्यासाठी ते १९२७ सालापासून चळवळ करीत होते. शेवटी महार वतन विधेयकही मरगळून पडले.

या सुमारास आंबेडकर एका अब्रूनुकसानीच्या खटल्याचे काम चालवीत होते. खटला मुंबईतील माजगाव न्यायालयात चालला होता. 'हिलाल' या उर्दू साप्ताहिकाचे संपादक अलिबहादूर खान यांनी 'विविधवृत्त' या मराठी साप्ताहिकाचे विख्यात संपादक रामचंद्र काशिनाथ तटणीस यांच्यावर अब्रूनुकसानीचा खटला भरला होता. आंबेडकरांनी आपले स्नेही तटणीस यांची बाजू मोठ्या चातुर्याने नि

जोराने लढविली. इंग्रजी नि हिंदी आधार देऊन जवळजवळ सात तास त्यांनी बचावाचे भाषण केले. ज्या लेखामुळे फिर्यादीची बदनामी झाली असे गृहीत धरण्यात आले होते, तो संपूर्ण लेख वाचल्यावर वाचकाच्या मनावर त्याचा काय परिणाम होतो हे पाहावयाला हवे. केवळ जो भाग आक्षेपार्ह वाटत आहे, तेवढाच वेगळा काढून वाचला जाऊ नये, अशी त्यांनी न्यायाधिशांना विनंती केली. आरोपीने चांगल्या हेतूने तो लेख लिहिला हे जरी त्यांनी सिद्ध केले, तरी फिर्यादीच्या हद्दपारीसंबंधी जो आरोप सूचित केला होता तो सिद्ध होत नसल्यामुळे आरोपीस पांच रुपये दंड झाला.

आंबेडकरांच्या निवडणुकीतील विजयाचे पडसाद अद्याप उठत राहिलेच होते. नोव्हेंबर १९३७ मध्ये मुंबईतील 'आदिद्रविड तरुण संघा'च्या काही अस्पृश्य वर्गीय तरुणांनी त्यांचा सत्कार केला. तरुणांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करू नये असा त्यांनी सत्कारास उत्तर देतेवेळी उपदेश केला. जर ते काँग्रेसमध्ये गेले तर अस्पृश्यांच्या दुःखांना वाचा फोडण्यास बाहेर कोणी उरणार नाही, असा त्यांनी इशारा दिला. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवडचात आंबेडकरांच्या पक्षातील नाशिकचे नेते भाऊराव गायकवाड यांचा मुंबईत सत्कार करण्यात आला. भाऊरावांनी दलितांच्या संघटनेचे अनेक वर्षे कळकळीने कार्य केले होते. अस्पृश्यांच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक हक्कांसाठी आपल्या नेत्याच्या अधिपत्याखाली त्यांनी मोठ्या निष्ठेने, हिरीरीने आणि त्यागाने अविरत झगडा केला होता. त्यासाठी वीर्यशाली लढा केला होता. त्या सत्कार-समारंभात बाबासाहेबांचे भावनोद्दीपक भाषण झाले. सेवा, सहकार व त्याग या गुणांविषयी आपले सहकारी भाऊराव यांची बाबासाहेबांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. असे उत्स्फूर्त गुणगान बाबासाहेबांच्या मुखावाटे निघणे ही मोठी दुर्लभ गोष्ट होती. यातच भाऊरावांच्या कार्याची, सेवेची नि कर्तृत्वाची थोरवी दिसून येते.

३० डिसेंबर १९३७ रोजी आंबेडकर पंढरपूर येथे भरणाऱ्या अस्पृश्य वर्गाच्या सोलापूर जिल्हा परिषदेस उपस्थित राहण्यासाठी मुंबईहून निघाले. पहाटेस कुर्डुवाडी स्थानकावर त्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत झाले. तेथून एका खास मोटारमधून ते पंढरपूरला गेले. वाटेत करकंब गावी मातंग समाजाच्या सभेपुढे भाषण करताना ते म्हणाले, 'काँग्रेस पक्षापासून सावध रहा. कारण आपली पिळवणूक, छळणूक नि रक्तशोषण करणाऱ्या लोकांशी काँग्रेसने तडजोड केलेली आहे. आपली पिळवणूक करणाऱ्या लोकांनी खादीचे कपडे व खादीची टोपी यांच्या आवरणाखाली आपले कल्याण करण्याचा आव आणला आहे, हे आपण विसरता कामा नये.'' दुपारी पंढरपूरला

पोहोचल्यानंतर उतारू बंगल्यापर्यंत त्यांना मिरवणुकीने नेण्यात आले. पंढरपूर नगरपालिकेचे अध्यक्ष त्या बंगल्यावर जाऊन आंबेडकरांना भेटले. तेथून ते दोघे नगरपालिकेच्या धर्मशाळेकडे निघाले. तेथेच परिषद भरली होती. आजूबाजूच्या खेड्यांतून अनेक स्त्रिया व पुरुष आपल्या थोर नेत्याच्या दर्शनासाठी नि त्यांचा उपदेश ऐकण्यासाठी परिषदेस आले होते. उपस्थितांची संख्या हजारावर असावी.

परिषदेपुढे भाषण करताना आंबेडकर म्हणाले, "आपल्यापुढे तीन प्रश्न आहेत. पहिला असा की, आपणांस हिंदुसमाजात कधी समान दर्जा प्राप्त होईल काय ? राष्ट्रीय उत्पन्नांचा योग्य भाग मिळेल की कसे हा दुसरा प्रश्न. तिसरा प्रश्न असा की, आपण चालविलेल्या स्वाभिमान-रक्षण आणि स्वावलंबन चळवळीचे पुढे काय होणार ? पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, जोपर्यंत जातिसंस्था अस्तित्वात राहील तोपर्यंत आपणांस हिंदुसमाजात समान दर्जा मिळणे शक्य नाही. काँग्रेस ही धनिकांच्या हातातील बाहुले बनली असल्यामुळे ती दलितांना वाईट रीतीने वागवीत असते. जोपर्यंत काँग्रेस धनिकांच्या वर्चस्वाखाली आहे, तो पर्यंत सध्याचे काँग्रेस सरकार दलितांच्या आर्थिकउन्नतीसाठी काही करू शकेल असा विश्वास बाळगणे व्यर्थ आहे. जे धनिक आपल्याला पिळतात त्या धनिकांच्या विरुद्ध एक आघाडी स्थापण्याची फारच आवश्यकता आहे. दलित वर्गाचे आर्थिक, स्वातंत्र्य संपादन करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की, दलितांच्या स्वालंबन नि स्वाभिमान-रक्षण चळवळीमुळे त्यांचा झाला तर फायदाच होणार, तोटा तर नाहीच नाही, ही गोष्ट त्यांनी ध्यानात ठेवावी. मरणाची भीती मात्र त्यांनी टाकून दिली म्हणजे झाले."

परिषदेने 'महारवतन विधेयका'ला मन:पूर्वक पाठिंबा दिला. नंतर लागलीच आंबेडकरांना पंढरपूर नगरपालिकेच्या सभागृहात नेण्यात आले. सभासदांनी त्यांचे सहर्ष स्वागत केले. नगराध्यक्षांनी समयोचित असे गौरवपर भाषण करून त्यांना पुष्पहार घातला. आंबेडकरांनीही त्या गौरवप्रसंगाला साजेसे उत्तर देऊन सर्व उपस्थितांचे आभार मानले.

पंढरपूर येथील परिषदेचे काम संपताच आंबेडकर मातंग परिषदेसाठी गले. तेथे सोलापूर नगरपालिकेने भागवत चित्रमंदिरात ४ जानेवारी १९३८ रोजी त्यांना मानपत्र दिले. सोलापूर नगरपालिकेचे अध्यक्ष रावबहादूर डॉ. व्ही. व्ही. मुळे यांनी मानपत्र वाचले, आणि ते आंबेडकरांना अर्पण केले. आपल्या अध्यक्षीय कारकीर्दित डॉ. वि. द. मुळे यांनी अस्पृश्यतानिवारणाच्या कामी फार मोठे सहाय्य केले होते. उत्तरादाखल केलेल्या भाषणात आंबेडकरांनी 'संसदीय लोकशाहीचे कार्य' या विषयाचे सखोल विवेचन केले.

ते म्हणाले, "आज या देशात राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे काँग्रेस या एकाच पक्षास मुजरा करण्याची सवय लोकांना जडली आहे. लोकशाहीचे ध्येय हे सर्वकाळी, सर्व ठिकाणी पुरस्कार करण्यासारखे आहे, असा माझा विश्वास नाही. हिंदुस्थानातील चालू परिस्थितीचे अवलोकन करता हिंदुस्थानला लोकशाही राज्याची पद्धत सर्वस्वी अयोग्य आहे. काही झाले तरी हिंदुस्थानला एखाद्या चांगल्या हेतूने प्रेरित झालेल्या सर्वाधिकाऱ्याच्या अंमलाची काही काळ आवश्यकता आहे, असे माझे मत आहे.

"ह्या देशात लोकशाही आहे. परंतु त्या लोकशाहीने आपली बुद्धी चालविण्याचे स्थगित केले आहे. तिने आपले हातपाय एकाच पक्षाशी जखडून ठेवले आहेत. त्या पक्षाचे विचार आणि त्याची कृती ह्यांविषयी कठोर चिकित्सा करून न्यायनिर्णय करण्याची तिची तयारी नाही. माझ्या मते हे मोठे दुखणे आहे. तो एक रोग आहे. मोठे आजारपण आहे. त्या रोगाने आपल्या सर्व लोकांना पछाडले आहे. त्याने ते बधीर झाले आहेत. मोठी दुर्दैवाची गोष्ट अशी की, हिंदी लोक परंपरेने बुद्धिवादी नसून अतिरिक्त श्रद्धाळू वृत्तीचे आहेत. जो सर्वसामान्य माणसाहून विक्षिप्तपणे वागतो आणि जो त्या विक्षिप्त वागण्यामुळे इतर देशांत पागल ठरतो तो ह्या देशात महात्मा किंवा योगी ठरतो आणि धनगराच्या पाठीमागून जशी मेंढरे जातात तसे लोक त्याच्या पाठीमागून जाऊ लागतात."

"ज्याच्याजवळ ऐकण्यासारखे काही आहे त्याचे बोलणे लोकशाहीने सन्मानपूर्वक ऐकले पाहिजे. सोलापूर नगरपालिकेने मला मानपत्र देऊन एक मोठा नवा पायंडा पाडला आहे. कारण सर्व लोकांनी ज्या पक्षाला उचलून धरले आहे व जो आपणांस एकमेव राजकीय पक्ष समजतो त्या पक्षाचा मी सभासद नसताना सोलापूर नगरपालिकेने मला मानपत्र दिले याविषयी मला आनंद होत आहे."[१]

आंबेडकरांनी आणखी एक भाषण करावे असा दुसऱ्या दिवशी त्यांना आग्रह करण्यात आला. कारण स्थानिक ख्रिश्चनांना त्यांची धार्मिक मते ऐकण्याची उत्सुकता होती. त्यामुळे गंगाधर जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एका सभेत त्यांचे भाषण झाले. त्यावेळी बाबासाहेब जरा खवचटपणे म्हणाले की, "धर्मांतराची घोषणा केल्यापासून आपण एक सौद्याचा आणि विनोदी नाटकाचा विषय झालो आहोत." 'वंदे भारतम्' या आचार्य अत्रे यांच्या नाटकाचा उल्लेख करून ते म्हणाले, 'अत्र्यांनी आमच्या

---

१. The Times of India, 4 January 1938.

धर्मांतराच्या प्रश्नाची थट्टा केली आहे. तरीसुद्धा आमचा निर्णय अढळ आहे. मी धर्मशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे ख्रिस्त आणि बुद्ध यांच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर फार परिणाम झालेला आहे. आम्हांस असा धर्म पाहिजे की, जो एका मनुष्याने दुसऱ्या मनुष्याशी कसे वागावे हा उपदेश करून समता, बंधुता नि स्वातंत्र्य या तत्त्वत्रयीप्रमाणे मनुष्याने दुसऱ्या बांधवांविषयी आणि देवाविषयी कर्तव्य काय हे शिकवील." बाबासाहेबांनी त्या ख्रिश्चन श्रोत्यांना असेही सांगितले की, "तुमचे धर्मबंधू दक्षिण हिंदुस्थानांत ख्रिस्ती देवळामधून जातिभेद पाळतात. शिवाय राजकीयदृष्ट्या ते मागासलेले आहेत. जर महार विद्यार्थी ख्रिश्चन झाला तर त्याची शिष्यवृत्ती बुडते. म्हणून अस्पृश्य ख्रिश्चन झाले तर त्यांचे त्यामुळे आर्थिक हित काहीच साधणार नाही. दुसरे असे की, सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी ख्रिश्चन लोक कधीही लढले नाहीत." [२] उपरोक्त सभेत आंबेडकरांनी ज्या दोन धर्म-संस्थापकांची नांवे उच्चारली ती पाहता, त्यांचे शीख धर्मावरील प्रेम लंडनभेटीनंतर विरून असे गेले दिसते. वरील भाषणाने हिंदी ख्रिश्चनांची कानउघाडणी तर झालीच; पण आंबेडकरांच्या मनात त्या वेळेस कोणते विचार घोळत होते त्याचेही ओझरते दर्शन घडले.

सोलापूरहून मुंबईस परत येताच आंबेडकर दुसऱ्याच एका महत्त्वाच्या कामात गढून गेले. शेतकऱ्यांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी विधिमंडळावर त्यांचा मोर्चा न्यायचा होता. मुंबईच्या परिसरातील ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, सातारा, नाशिक ह्या जिल्ह्यांतील शेतकरी आगगाडीने नि आगबोटीने मुंबईस आले होते. त्या शेतकऱ्यांचे कपडे फाटके होते. प्रत्येकाच्या हातात काठी, खांद्यावर घोंगडी नि भाकरीच्या जुड्या होत्या. त्यांचे चेहरे उन्हाने काळपटलेले होते. पण आपली गाऱ्हाणी आपण विधिमंडळासमोर मांडणार ह्या उत्साहाने त्यांचे चेहरे उजळून गेले होते. त्यांचा मोर्चा तीन दिशांनी विधिमंडळाच्या सभागृहाकडे चालून आला. एक परळकडून, दुसरा अलेक्झांड्रा गोदी-कडून तर तिसरा चौपाटीकडून. पोलिस प्रत्येक मिरवणुकीसंगे चालत होते. महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस तुकड्या उभ्या होत्या. 'खोतीचा नाश होवो', 'आंबेडकरांच्या विधेयकाला पाठिंबा द्या' अशा घोषणा ते करीत होते. दुपारी दीड वाजता बोरीबंदर जवळील आझाद मैदानावर मिरवणुकी येऊन थडकल्या. पोलिस अधिकाऱ्यांनी मिरवणुकी तेथेच थोपवून धरल्या. वीस निवडक नेत्यांना मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी पुढे जाऊ देण्यात आले. शामराव परुळेकर, सी. चिं. जोशी, दत्तोपंत राऊत, इंदुलाल

---

२. जनता, १५ फेब्रुवारी १९३८.

याज्ञिक, आणि अ. वि. चित्रे ह्यांचे एक शिष्टमंडळ आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्र्यांना भेटले. शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांपुढे जी पहिली मागणी ठेवली ती शेतावर काम करणाऱ्या मजुरांचे किमान वेतन ठरविण्याविषयीची. महसूल करात ज्याप्रमाणे सूट देण्यात आली होती, त्याचप्रमाणे थकलेल्या भाडचाच्या पैशात सूट द्यावी. दुसरी मागणी अशी होती की, मालकांना भरपाई दिल्याशिवाय किंवा देऊन इनामदारी व खोती या पद्धती नष्ट करण्याबाबत ताबडतोब कायदा करावा. सामाजिकदृष्टया जुलमी, आर्थिकदृष्टचा कुचकामी ठरलेली जमीनदारी संपुष्टात आणलीच पाहिजे. लहान शेतकऱ्यांना कालव्याच्या पाण्याचे दर निम्मे करावेत ही होती तिसरी मागणी. मंत्री म्हणाले की, आपले सरकार आपल्या परीने सर्व प्रश्नांचा विचार करीत आहे. मुख्यमंत्र्यांपुढे निवेदन मांडून शिष्टमंडळ परत आझाद मैदानावर आले. मुख्य नेत्यांनी त्या प्रचंड सभेपुढे भाषणे केली. आंबेडकरांचे भाषण जोरदार नि परिणामकारक झाले. कामगारनेते आंबेडकर म्हणाले," आपण कम्युनिझमसंबंधी वाचलेल्या पुस्तकांची संख्या सर्व भारतीय कम्युनिस्टांनी त्यासंबंधी वाचलेल्या पुस्तकांपेक्षा जास्त भरेल. [३] कम्युनिस्ट हा कोणत्याही प्रश्नांची व्यावहारिक बाजू कधीही पाहत नाही. जगामध्ये दोनच वर्ग आहेत. गरीब व श्रीमंत. पिळले जाणारे व पिळणारे. तिसरा मध्यम वर्ग. परंतु तो अगदी लहान आहे. म्हणून शेतकरी व कामगार यांनी आपल्या दैन्याची कारणे कोणती आहेत त्याचा विचार करावा. त्यांच्या दैन्याची कारणे त्यांना पिळणाऱ्यांच्या श्रीमंतीत आहेत असे दिसून येईल. त्याला उपाय एकच. तो म्हणजे त्यांनी जातिनिरपेक्ष बुद्धीने मजुरांची आघाडी संघटित करून आपले खरे हित करतील असेच कार्यकर्ते विधिमंडळावर निवडून देणे. त्यांनी असे जर घडवून आणले तरच त्यांना आसरा आणि वस्त्र ह्यांचा लाभ होऊ शकेल. राष्ट्रासाठी अन्न व इतर संपत्ती निर्माण करणारे जे तुम्ही ते भुकेकंगाल होणार नाही." आंबेडकरांच्या या भाषणाचा आवेग, तर्कशुद्धता व बोचकपणा कुठल्याही कम्युनिस्ट नेत्याला लाजवील. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना अशी भीती वाटली की, आंबेडकर हे शेतकरी, कामगार आणि भूमिहीनांचे एक प्रभावी पुढारी बनतील.

शेतकऱ्यांच्या उद्धाराची चळवळ करीत असता राज्यकर्त्या पक्षाशी ज्या प्रश्नांसंबंधी आंबेडकरांची मोठी खडाजंगी झाली, तो प्रश्न अस्पृश्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. 'स्थानिक स्वराज्य' निर्बंधात (कायद्यात) दुरुस्ती करण्यासाठी राज्यकर्त्या पक्षाने एक विधेयक मांडले होते. त्यात अस्पृश्य वर्गीयांचा 'हरिजन'

---

३. जनता, १५ जानेवारी १९३८.

असा उल्लेख केला होता. आंबेडकरांचे प्रमुख सहकारी भाऊराव गायकवाड यांनी एक दुरुस्तीचा ठराव मांडून 'हरिजन' हे अभिधान आपल्या समाजाला लावू नये अशी विनंती केली. आपल्या सूत्रबद्ध भाषणात गायकवाड म्हणाले की, "अस्पृश्य वर्गाने अनेक सभांतून नि परिषदांतून हे अभिधान आम्हांस नको असे घोषित केले आहे. म्हणून हरिजन या अभिधानाला सरकारने नैर्बंधिक मान्यता देऊ नये. हे जर तुम्ही ऐकले नाही तर तुमचे ते कृत्य निषेधाच्या लाटा उठविल्याशिवाय राहणार नाही." गायकवाड यांनी शेवटचा टोला हाणला, 'महाराज, जर अस्पृश्य देवाचे लोक आहेत तर स्पृश्य वर्ग का राक्षसाचे आहेत ! "जर सर्वच लोकांना हरिजन म्हणावयाचे असेल तर त्याला आमचा विरोध नाही. अस्पृश्यांना नुसते गोड नाव देऊन भागणार नाही. त्यांच्या उत्कर्षासाठी काहीतरी भरीव कार्य करावे." द. व. राऊत यांनी दुरुस्ती ठरावाला पाठिंबा दिला. स्थानिक स्वराज्य मंत्री ल. म. पाटील म्हणाले की, केवळ नावात फरक केल्यामुळे अस्पृश्यांची हलाखीची स्थिती सुधारणार नाही, हे खरे. परंतु अस्पृश्य ह्या शब्दाला जो काळीमा लागलेला आहे तो दूर करण्यासाठी व त्या समाजाला प्रतिष्ठा देण्यासाठी 'हरिजन' हे नाव सरकार त्यांना देत आहे.

गायकवाडांनी मांडलेला दुरुस्तीचा ठराव फेटाळला गेला. काँग्रेस राज्यकर्त्यांनी 'हरिजन' हे अभिधान अस्पृश्यांच्या गळ्याखाली बळेच उतरविले. निवडणुकीत अस्पृश्यांच्या पंधरा राखीव जागांपैकी जरी काँग्रेसला दोनच मिळाल्या होत्या, तरी त्यांनी हे बेधडक कृत्य केले, हे विशेष लक्षात घेतले पाहिजे. गायकवाडांचा ठराव फेटाळला जाताच सभागृहामध्ये आंबेडकर ताडकन उठले आणि निश्चयपूर्वक म्हणाले, "मला दुःख होत आहे. ह्या विषयासंबंधी अस्पृश्य समाजाच्या इच्छेला मान दिला पाहिजे होता. जर गायकवाडांचा ठराव मान्य झाला असता तर कोणीही दुःखी झाले नसते अथवा देशाच्या हिताला काही बाधा आली नसती. सरकारने आपले बळ अशा जुलुमी रीतीने वापरलेले पाहून मला वाईट वाटते. आम्हीदेखील सरकारला आपली नापसंती दाखवावी म्हणून आजच्या पुढील कामकाजात भाग न घेता सर्व गटच्या गट बाहेर जातो." मुख्यमंत्री खेर यांनी दलित वर्गाच्या सभासदांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, "हरिजन हा शब्द आदरशील आहे आणि तो अभिप्रेत अर्थ व्यक्त करू शकतो. तो शब्द मूळचा संतकवी नरसी मेहता यांच्या कवितेतला आहे." आंबेडकर म्हणाले, 'आपणांस येथे एवढेच सांगावयाचे आहे की, ह्यापेक्षा एखादे चागले नाव सुचविता येणे शक्य नाही असे नाही. राज्यकर्त्या पक्षाला आपल्या पक्षाशी विचारविनिमय करून दुसरे एखादे नाव शोधून काढता आले असते. खेरांच्या स्पष्टीकरणाने आमचे समाधान झालेले नाही." असे म्हणून त्यांनी सभागृहाचा

त्याग केला. मागून त्यांच्या पक्षाचे सभासद सभागृहाबाहेर पडले. त्यांनी 'हरिजन' अभिधान कधीच मान्य केले नाही. गुजरातमधील भूदासांना 'हरि' म्हणत असत हे आंबेडकरांना माहीत असावे.

दलितांच्या उद्धाराच्या कार्यात आंबेडकर आता अगदी समरस झाले होते. काही काळ लोकांना वाटले की, आता बाबासाहेबांचा ग्रंथांशी जडलेला संबंध सुटला. ग्रंथांऐवजी त्यांना लोकांचा छंद लागला. जनतेची गाऱ्हाणी ऐकायची, प्रत्यक्ष त्या त्या स्थळी जाऊन लोकांच्या प्रश्नांची माहिती करून घ्यावयाची, त्यांविषयी त्यांना मार्गदर्शन करावयाचे आणि त्यासंबंधी सरकारकडे दाद मागावयाची, असा त्या दिवसांत त्यांचा क्रम असे. आंबेडकर म्हणजे दलितांच्या दुःखाची किंकाळी, त्यांच्या मताचे प्रतिनिधी आणि त्यांच्या आणाभाकांचे प्रतीक बनले. नगर येथे शेतकरी नि कामगार ह्यांनी आपल्या मार्गदर्शनासाठी आंबेडकरांना पाचारण केले. म्हणून २५ जानेवारी १९३८ रोजी नगर येथे त्यांनी त्यांच्या परिषदेला मार्गदर्शन केले. नगर येथे भाऊसाहेब कानवडें ह्या स्थानिक वकिलांनी त्यांना जिल्हा लोकल बोर्डात अल्पोपहार दिला. सरदार थोरात व त्रिभुवन वकील हेही त्यात सहभागी होते. नंतर सायंकाळी त्याच जिल्ह्यातील अकोला या गावी ते खास मोटारगाडीने गेले. मार्गात अनेक ठिकाणी जनतेने त्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. तेथे त्यांनी छोटेसे भाषण करून तेथे भरलेल्या परिषदेस मार्गदर्शन केले. त्या परिषदेत आंबेडकरांनी विधिमंडळात मांडलेल्या विधेयकांना पाठिंबा देण्यात आला.

शेतकऱ्यांप्रमाणेच रेल्वे कामगारांचीही संघटना करण्याचे काम आंबेडकरांनी हाती घ्यावयाचे ठरविले. सन १९३८ च्या १२ आणि १३ फेब्रुवारीला मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगारांची एक मोठी परिषद भरली. वीस हजार कामगार त्या परिषदेस हजर होते. त्यावेळी ते आपल्या भाषणात म्हणाले, "कुमार अवस्थेत मी आपल्या नातलगांचे जेवणाचे डबे पोचवण्याचे काम केलेले असल्याने कामगारांच्या प्रश्नांविषयी मला निकटची माहिती आहे. त्यावेळी कामगारांची स्थिती काहीशी निराळी होती. कामगारांत फूट पडेल या भीतीने अस्पृश्य कामगारांवर जो अन्याय होई तो जुने कामगार दूर करण्याचा प्रयत्न करीत नसत. आजची परिषद अपूर्व अशी आहे. आजवर सामाजिक अन्याय व गाऱ्हाणी दूर करण्यासाठी आपण लढा केला. त्यात आपण बरेच यशही मिळविले. त्याचा परिणाम राजकीय प्रतिनिधीत्व मिळविण्यात झाला. आता आपण आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी कार्य सुरू केले आहे. आजवर आपण अस्पृश्य वा दलित म्हणून जमायचे, परंतु आज आपण कामगार

म्हणून जमलो आहोत. मी या देशाचा शत्रू आहे असे आजपर्यंत मानण्यात येई. आता मी कामगारांचा शत्रू आहे असे म्हणण्यात येते. ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हेच दोन कामगारांचे खरे शत्रू आहेत." त्या भाषणात आंबेडकर पुढे म्हणाले, "ब्राह्मणशाही याचा अर्थ मी ब्राह्मणांना लाभलेली सत्ता, त्यांचे विशेष हक्क वा हित असा करीत नाही. त्या अर्थाने मी ब्राह्मणशाही हा शब्द वापरीत नाही. माझ्या मते स्वातंत्र्य, समता नि बंधुभाव यांचा अभाव म्हणजे ब्राह्मणशाही. त्या अर्थाने पाहता ब्राह्मणशाही सर्व वर्गामध्ये अमर्यादपणे वास करीत आहे. ब्राह्मणशाहीचे उत्पादक ब्राह्मणच असले तरी तिची मर्यादा ब्राह्मणसमाजापर्यंतच नाही. ब्राह्मणशाहीचे दुष्परिणाम केवळ सामाजिक हक्क, आंतरजातीय विवाह नि सहभोजने यांवरच होत नाहीत. तिने नागरिक हक्कसुद्धा नाकारले आहेत. ब्राह्मणशाही सर्वदर्शी असल्यामुळे आर्थिक क्षेत्रातील संधीवरही तिचे परिणाम होतात.

आंबेडकर पुढे म्हणाले, "आपल्या दलित वर्गाला जी संधी मिळते आणि स्पृश्य कामगाराला जी संधी मिळते त्यांची तुलना केली असता असे दिसून येईल की, अस्पृश्य कामगाराला काम मिळण्याची, नोकरी मिळण्याची व त्यात प्रगती करण्याची संधी कमीच असते. अशा पुष्कळ नोकऱ्या असतात की, जेथे अस्पृश्यतेमुळे अस्पृश्य कामगारांना त्यातून वगळण्यात येते. कापड गिरण्यातील काही विभागांत अस्पृश्य कामगार घेत नाहीत. रेल्वेत तर गँगमेनच्या नोकरीतच कुजत राहणे हे त्यांच्या नशिबी असते. फार काय त्यांना अस्पृश्यतेमुळे हमाल म्हणूनसुद्धा नेमण्यात येत नाही. कारण हमालांना स्टेशनमास्तरांच्या घरी घरकामासाठी नोकर म्हणून राबविण्यात येते. तेथे अस्पृश्य हमाल कसे चालतील ? तीच स्थिती रेल्वे कारखान्यांत जोपर्यंत तत्त्वाच्या दृष्टीने धडधडीत अन्याय आणि संघटनेच्या दृष्टीने एकजुटीला अपायकारक असलेला हा अन्याय नि पक्षपात दूर होत नाही, तोपर्यंत कामगारांत एकजूट कशी निर्माण होईल ?" असा आंबेडकरांनी आपल्या टीकाकारांना प्रश्न केला. "यास्तव कामगारांची एकजूट करावयाची असेल, तर त्यांनी ब्राह्मणशाहीचे निर्मूलन केले पाहिजे. तरच कामगारांची खरी जूट होईल"[१] असा त्यांनी कामगारांना उपदेश केला.

हिंदुस्थानातील कामगारसंघटना वाईट स्थितीत आहे असे त्यांनी आपले मत दिले. ते तुंबलेले, घाणेरडे डबके होते. कारण कामगार संघटनेचे नेतृत्व त्यांच्या मते मित्रे, स्वार्थी नि भलत्याच मार्गाने जाणारे होते. कामगारसंघटनांचे आपापसांतले

---

१. The Times of India, 14 February 1938.

तंटे इतके भयानक होते की, प्रत्यक्ष कामगार नि भांडवलवाले यांच्यामध्ये तसे भयानक भांडण नव्हते. कम्युनिस्टांनी मिळविलेल्या सत्तेचा नि शक्तीचा दुरुपयोग केला, असेही ते म्हणाले.

काँग्रेसमध्ये वा काँग्रेसबाहेर कामगारांची स्वतंत्र संघटना असावी ह्या तत्त्वाला मानवेंद्र रॉय यांनी विरोध केला, हे पाहून आंबेडकरांना आश्चर्य वाटले. रॉय हे इतरांप्रमाणे आंबेडकरांनाही गूढ वाटले. रॉय कम्युनिस्ट असून कामगारांच्या स्वतंत्र संघटनेस विरोध करतात ही एक भयंकर विसंगती नि विरोधाभास आहे असे त्यांना वाटले. "रॉय यांच्या या मतामुळे लेनीन आपल्या समाधीत तडफडला असेल" असे ते म्हणाले. ते आणखी म्हणाले, "कदाचित रॉय यांच्या मताप्रमाणे हिंद्री राजकारणाचे प्रमुख ध्येय साम्राज्यशाहीचा नाश करणे असेल, परंतु जर साम्राज्यशाहीच्या पाडावानंतर, कामगारांना जमीनदार, गिरण्यांचे मालक, यांच्याशीही लढावे लागणार आहे—कारण ते कामगारांचे रक्तशोषण करण्यासाठी हिंदुस्थानांतच राहणार—तर साम्राज्यशाहीप्रमाणे भांडवलशाहीशीही लढण्याची तयारी त्यांना या क्षणापासून केली पाहिजे" असा आंबेडकरांनी कामगारांना इषारा दिला.

त्याच मंडपात अस्पृश्य तरुणांची एक परिषद भरली होती. मुरलीधर पगारे ह्यांनी स्वागतपर भाषण केल्यानंतर डॉ. बाबासाहेब यांनी एक अत्यंत बोधपर, स्फूर्तिदायक आणि हृदय थरारून सोडणारे भाषण केले. तरुणांना उपदेश करताना ते म्हणाले, "आयुष्यात भव्य ध्येय असणे हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा नियम आहे, हे तुम्ही ध्यानांत ठेवा. जीवनात स्वतःच्या उत्कर्षाचे वा देशाच्या उत्कर्षाचे कोणते का ध्येय असेना, ते गाठण्यासाठी मनुष्याने अष्टौप्रहर झटले पाहिजे. जगातील सर्व महान गोष्टी अखंड उद्योगशीलतेने नि हालअपेष्टांना तोंड देऊन साध्य झालेल्या आहेत. आपल्या ध्येयावर आपले शक्तीसर्वस्व केंद्रीभूत करावे. मनुष्याने जगण्यासाठी अन्न खावे. त्याने समाजाच्या उद्धारासाठी काम करीत जगावे."

शिक्षणाच्या प्रश्नांसंबंधी ते म्हणाले, "शिक्षण हे दुधारी शस्त्र असल्यामुळे चालविण्यास धोक्याचे असते. चारित्र्यहीन आणि विनयहीन सुशिक्षित माणूस हा पशुपेक्षा भयंकर असतो. जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास विरोधी असेल तर तो समाजाला शाप ठरतो. अशा सुशिक्षितांचा धिक्कार असो. शिक्षणापेक्षा चारित्र्य अधिक महत्त्वाचे. तरुणांची धर्मविरोधी प्रवृत्ती पाहून मला दुःख होते. काही लोक म्हणतात, धर्म ही अफूची गोळी आहे. परंतु हे खरे नाही.

माझ्या ठायी जे चांगले गुण वसत आहेत ते किंवा माझ्या शिक्षणामुळे समाजाचे जे काही हित झाले असेल, ते माझ्या ठायी असलेल्या धार्मिक भावनेमुळेच होय. मला धर्म हवा आहे. धर्माच्या नावाने चाललेला ढोंगीपणा नको." परिषद यशस्वी झाली. संधी मिळाली तर अस्पृश्य नेतेही जनससुदायाची संघटना करू शकतात हे या परिषदेवरून सिद्ध झाले.

मुंबईस परत आल्यावर ताडवाडी येथे १९ मार्च १९३८ रोजी बाबासाहेबांना 'विविधवृत्ता'चे संपादक रामभाऊ तटणीस यांच्या अध्यक्षतेखाली एक लहानशी थैली अर्पण करण्याचा समारंभ झाला. दलित समाजाने स्वतंत्र मजूर पक्षास मिळावे असे आपल्या भाषणात आवाहन करून बाबासाहेब पुढे म्हणाले, "माझी प्रकृती ठीक नाही. प्रकृतीस्वास्थ्यासाठी दर शनिवारी नि रविवारी मी उपोषण करावे, असा डॉक्टरांनी मला सल्ला दिला आहे. पाणीसुद्धा पिण्याची डॉक्टरांनी मला मनाई केली आहे. सोमवारी दुपारी उपोषण सुटते. काही लोक आपला नवस फेडण्यासाठी उपोषण करतात किंवा देवाने प्रार्थना ऐकावी या उद्देशाने उपोषण करतात. परंतु मी माझी पचनक्रिया सुधारण्यासाठी उपोषण करीत आहे." आंबेडकरांच्या ह्या उपोषणाचा प्रतिध्वनी विधिमंडळातही उठला. त्यावेळचे मुंबईचे गृहमंत्री कन्हैय्यालाल मुन्शी यांनी दोन जुगारी कैद्यांची शिक्षा माफ करून त्यांना सोडून दिले. त्या कृत्याचा निषेध करताना आंबेडकरांनी विधिमंडळात तडाखेबाज भाषण केले. भाषण करीत असता ते एक घोट पाणी प्याले. एका काँग्रेस आमदाराने सभापतींना विचारले, "महाराज, सभागृहात पेय घेता येते की कसे ?" त्यावर आंबेडकरांनी वरीलप्रमाणे खुलासा केला.

विधिमंडळाच्या निवडणुकीमध्ये यश लाभल्यामुळे आंबेडकरांना जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीकडे लक्ष देण्यासाठी हुरूप आला. इस्लामपूर येथे त्यांनी भाषण करून सातारा जिल्हा मंडळावर (लोकल बोर्डावर) आपल्या पक्षाचे उमेदवार निवडून देण्याची जनतेस विनंती केली. तेथील भाषणात त्यांनी 'मराठ्यांनी काँग्रेसव्यतिरिक्त एक स्वतंत्र पक्ष स्थापावा' असे सुचविले. कारण काँग्रेस ही शेटजी नि भटजी यांच्या हातातले बाहुले असल्यामुळे शेतकरी नि मध्यम वर्ग यांच्या हितार्थ ती काहीही करू शकणार नाही असे त्यांनी सांगितले. येते वेळी सातारा आणि पुणे शहरांना भेटी देऊन ते मुंबईस परतले.

त्याच महिन्यात विधिमंडळात प्राथमिक शिक्षणाच्या निर्बंधात सुधारणा करण्याच्या उद्देशाने एक विधेयक राज्यकर्त्यांनी विचारविनिमयासाठी मांडले होते.

त्यावर चर्चा होत असताना गृहमंत्री कन्हैयालाल मुनशी आणि आंबेडकर यांच्यामध्ये चकमकी उडाल्या. मुनशी हे एक तडफदार वकील व निष्णात वादविवादपटू होते. या दोघांच्या विचारसरणीत मूलभूत फरक होता, तसाच त्यांच्या स्वभावातही, ठसठशीत वेगळेपणा होता. ते एकमेकांना कडाडून विरोध करीत.

त्या विधेयकावर चर्चा होत असताना आंबेडकरांनी गांधीप्रणीत वर्धा शिक्षण योजनेवर हल्ला केला. मुनशींचा राग अनावर झाला. ते उठून म्हणाले की, "आंबेडकर वर्धा योजनेवर मत देण्यास योग्य असे अधिकारी पुरुष नाहीत. इतकेच नव्हे तर विधिमंडळातील इतर आमदारांनाही त्या विषयाची यथार्थ कल्पना नसल्यामुळे त्यांचीही त्यावर मत देण्याची पात्रता नाही."

सभागृहाचा मुनशींनी केलेला हा अपमान पाहून आंबेडकर ताडकन उठून म्हणाले, "असे असेल तर तुम्ही विधिमंडळ अजिबात बडतर्फ करावे !" त्यावर प्रश्नोत्तरे वाढत गेली.

मुनशी–मान्यवर सभासदांना विधिमंडळाच्या सर्वसामान्य तत्त्वांची आणि निरनिराळे तांत्रिक कार्य कसे चालते हे जाणण्याची बुद्धीही नाही. सरकार जे नियम करते ते छापण्यास सभासदांच्या बहुमतांची मंजुरी लागते.

आंबेडकर – याचा अर्थ विरोधी पक्षाला काही मतच नाही असे आमच्या सन्माननीय मित्राला म्हणावयाचे आहे काय ?

मुख्यमंत्री खेर – जे सरकार तुम्ही उखडू शकला नाहीत, ज्याच्यावर दबाव आणू शकला नाहीत किंवा तुमचे म्हणणे मान्य करायला ज्याचे मन वळवू शकला नाहीत अशा सरकारच्या अधिकाराखाली तुम्ही जेव्हा वागत होता तेव्हा. . . .

आंबेडकर – (किंचित रागाने) सध्याची परिस्थिती तिजहून वेगळी आहे काय ?

सभापती – शांतता राखा ! शांतता राखा !

येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, आंबेडकर हे केवळ शिक्षण विषयावरील अधिकारी पुरुष होते एवढेच नव्हे तर ते विधिमहाविद्यालयाचे प्राध्यापक होते आणि मुनशी तर केवळ वकील होते. आंबेडकरांपेक्षा त्यांचे शिक्षणशास्त्र-विषयक ज्ञान मुळीच अधिक नव्हते. आंबेडकर शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्ष वावरले होते. शिक्षणक्षेत्रातील अनेक प्रश्नांचा त्यांनी अभ्यास केला होता. त्या क्षेत्रातील त्यांचा अनुभवही मोठा होता.

एप्रिल १९३८ च्या पहिल्या आठवड्यात विधिमंडळात राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाच्या अशा प्रश्नांची चर्चा होत होती. तो प्रश्न म्हणजे स्वतंत्र कर्नाटकाची मागणी. कर्नाटक मुंबई प्रांतापासून वेगळे करण्याची ती मागणी होती. त्या ठरावावर मत देताना आंबेडकरांनी अशी भीती व्यक्त केली की, कर्नाटक हा केवळ लिंगायतांचा प्रांत होईल आणि तो बिगरलिंगायतांचा विरोधक बनेल. अशा प्रकारच्या जातीय विभागणीच्या विरुद्ध ब्रिटीश सरकार होते. त्या सरकारने ज्या दोन देणग्या या देशास दिल्या त्याविषयी आंबेडकरांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यापैकी पहिली देणगी म्हणजे सर्वांना लागू केलेला एकच एक निर्बंध, आणि दुसरी देणगी म्हणजे केंद्रीय सरकार. आंबेडकर आणखी पुढे म्हणाले की, "सर्व भारतीयांनी आपण भारतीय आहोत अशी भावना निर्माण करणे हेच सर्वांचे समान ध्येय असले पाहिजे." त्यांनी सभागृहाला पुढील शब्दांत धोक्याचा इशारा दिला. "आपण सर्व भारतीय आहोत या भावनेने अद्याप अंकुर धरलेला नाही आणि आता ती कुठे अंकुर धरू लागली आहे, तोच आपल्या वेगळ्या प्रांतिक अभिमानाच्या, संस्कृतीच्या आणि देशभक्तीच्या कल्पनांना मोकाट सोडणे हा माझ्या दृष्टीने गुन्हा होय. माझ्यापुरते बोलायचे तर मी ह्या ठरावाशी सहमत होऊ शकत नाही. ह्या ठरावाला ह्यासाठीच मी कडाडून विरोध करीत आहे." देशभक्तीने भारावलेल्या ह्या भाषणाचा सभागृहावर चांगलाच परिणाम झाला. त्यांचे हे भाषण टाळ्यांच्या गजरात संपले.

विधिमंडळात आणखी एक विधेयक त्यावेळी चर्चेस मांडले गेले होते. मुंबई शहराच्या पोलिस निर्बंधात सुधारणा करण्याचा त्या विधेयकाचा उद्देश होता. ह्या विधेयकावर जेवढा प्रखर हल्ला झाला आणि जेवढी कडवट चर्चा झाली तेवढी दुसऱ्या कोणत्याही विधेयकावर झाली नव्हती. विरोधी पक्षांतील प्रत्येक नेत्याने त्याचे वाभाडे काढले. विरोधी पक्षांतील नेत्यांनी त्या विधेयकात सुचविलेले पर्याय आणि योजना दंगेखोरांनाच लागू कराव्या अशी परोपरीची सूचना करण्यात आली. त्या विधेयकाला उपसूचना मांडताना आंबेडकर म्हणाले, "समाजातील अत्यंत दुष्ट व घातकी वर्तनाच्या गुंडांकडून जनतेला पीडा आणि जनतेच्या जीविताला धोका उत्पन्न होतो, ही गोष्ट मी मान्य करतो. मुंबईतील गुन्हेगारीच्या जगात २० वर्षांहून अधिक काळ मी वावरलो आहे. इतर कोणापेक्षा किंबहुना पोलिस आयुक्त (कमिशनर) साहेबांपेक्षाही मला त्या जगाची अधिक माहिती आहे. गरीब लोकांना हे मवाली दादा पीडा देतात. त्यांना आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणे दुरापास्त होते. अधिक पीडा होऊ नये म्हणून ते बिचारे गप्प बसतात. त्या समाजकंटकांना शासन करविण्यासाठी ते न्यायालयाकडे मवाल्यांच्या भीतीमुळे धाव घेऊ शकत नाहीत हे आपणांस पूर्ण माहीत आहे."

जातीय दंग्यांचा उल्लेख करून ते म्हणाले, " प्रतिवर्षी घडणारा हा रक्तपात कायमचा बंद झाला पाहिजे, याविषयी दुमत नाही. परंतु पोलीस आयुक्ताने ह्या सत्तेचा दुरुपयोग करू नये म्हणून निर्बंधात काही तरतुदी आताच करून ठेवल्या पाहिजेत. शासनाला ह्या तजविजींचा उपयोग दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी करता येऊ नये. ज्या कारणांसाठी ह्या तरतुदी आहेत त्या कारणांसाठीच त्या वापरल्या पाहिजेत. त्यात कुठेही पळवाट किंवा उणीवा ठेवता कामा नये, " अशी सभागृहाला त्यांनी विनंती केली.

ह्या विधेकाची चर्चा होत असताना काही गमतीदार क्षण सभागृहाला लाभले. जमनादास मेथांनी विधेयकाच्या पहिल्या वाचनाच्या वेळी विरोध केला होता. ते म्हणाले, " गुन्हेगार टोळीपैकी प्रत्येकाला बचावाचा अधिकार असलाच पाहिजे." त्यावर आंबेडकरांनी त्यांना विचारले, " हा काय आदर्श आहे ?" त्यावर जमनादास म्हणाले की, " नागरिक स्वातंत्र्याची अशी गळचेपी करणे अमेरिकन लोकांनाही योग्य वाटले नाही." थोड्या वेळानंतर आंबेडकर म्हणाले की, " ही उपाययोजना कामगारांच्या कलहाला लावू नये. या बाबतीत मला जमनादास मेथांपेक्षा अधिक चिंता वाटते." त्यावर जमनादास उत्तरले, " नाही, माझ्याइतकीच चिंता; अधिक नाही." त्यावर आंबेडकर पुन्हा म्हणाले, ' तुमच्या परवानगीने मी म्हणतो की, मला तुमच्यापेक्षा अधिक चिंता आहे !"

- आंबेडकरांनी गृहमंत्र्यांना 'कम्युनिटी' ह्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्यास विनंती केली.

मे १९३८ च्या पूर्वार्धात आंबेडकर सतनामी गुरूंच्या खटल्याच्या बाबतीत नागपूर येथे न्यायालयात काम चालविण्यास गेले होते. ते काम संपल्यावर तेथील लोकांनी त्यांचा मोठा सत्कार केला. रात्री वादळ, पाऊस आणि वीजा ह्यांनी थैमान घातलेले असतानाही लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांचे भाषण ऐकावयास जमल्या होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी कामटी येथे भरलेल्या विद्यार्थ्यांच्या सभेत त्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. नंतर ते मुंबईस परतले.

काँग्रेस पक्षाची मुंबई प्रांतात जरी राजवट सुरू झाली होती तरी आंबेडकर विधिमहाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करीत होतेच. त्यांनी मे १९३८ मध्ये त्या पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या कार्याविषयी विधिमहाविद्यालयाच्या मासिकात म्हटले होते की, ' विद्यार्थ्यांना ज्यांच्या ज्ञानाविषयी व कर्तृत्वाविषयी आदर

वाटत आहे अशा प्राचार्यास कॉलेज मुकले आहे हे निःसंशय. त्यांची व्याख्याने व्यासंगपूर्ण असत व विद्यार्थी ती एकचित्त होऊन ऐकत. प्राचार्य आंबेडकरांच्या कारकीर्दीत महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध झाले' असे ह्या मासिकाने कृतज्ञतापूर्वक म्हटले असून 'निर्बंधशास्त्रासंबंधीचे त्यांचे विचार फार क्रांतिकारक होते' असेही नमूद केले आहे.

१३ मे १९३८ रोजी आंबेडकर कोकणच्या दौऱ्यावर निघाले. कोल्हापूरमार्गे ते कणकवली येथे परिषदेसाठी गेले. दौऱ्यासाठी कोल्हापूरचे दत्तोबा पवार यांना मोटारची व्यवस्था करावयास सांगितले. कोकणातील शेतकरी चळवळीमध्ये प्रमुख असलेले अनंतराव चित्रे, कवळी, प्रधान, टिपणीस आदी सहकारी उपस्थित होते. कणकवली गावाला ध्वनिक्षेपकाचे या वेळीच प्रथम दर्शन झाले. महाराष्ट्रातील वीस लाख महारांनी आपले हक्क संपादन करण्यासाठी आणि सन्मानाने उदरनिर्वाह करण्यासाठी अविरत झगडले पाहिजे असा त्यांनी त्या परिषदेस उपदेश केला. अस्पृश्यांनी भीक मागून उष्टचा तुकडचावर जगण्याची खोड टाकून द्यावी. विधिमंडळातील आपल्या प्रतिनिधींच्या कामाकडे त्यांनी लक्ष ठेवावे. खोती नष्ट करून त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याचा आपला निर्धार त्यांनी प्रकट केला. आपण मांडलेले विधेयक जर विधिमंडळात मंजूर झाले नाही, तर त्यांनी निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ करण्यास तयार असावे, असा इशाराही दिला.

दुसऱ्या दिवशी आंबेडकरांनी देवरूख नि अरवली या गावांना भेटी दिल्या. तेथे त्यांनी अस्पृश्य समाजासमोर छोटी छोटी भाषणे केली. मे १५ ला रात्री ते चिपळुणला पोहोचले. सकाळी गुहागरच्या सभेत भाषण करून ते पुन्हा सभेसाठी चिपळुणला परतले. चिपळुणच्या सभेत ते म्हणाले की, " गांधींची मोहिनी विद्या माझ्यावर छाप पाडू शकली नाही. जवाहरलाल नेहरू व सुभाष बोस गांधीना शरण गेले. परंतु मी गांधींना कधीही शरण जाणार नाही आणि जर कधी काळी मी काँग्रेसमध्ये गेलो तर, स्वतःच्या गुणवत्तेने तेथेसुद्धा छाप पाडीन. दहा महिने माझे खोती नष्ट करण्याचे विधेयक काँग्रेसने बुद्धचा पाडून ठेवले आहे. पाठिंब्याच्या अभावी जर का ते विधेयक यशस्वी झाले नाही, तर शेतकऱ्यांनी करबंदीची चळवळ सुरू करावी. मी स्वत: त्या प्रश्नावर तुरुंगात जाण्यास तयार आहे. ऐंशी टक्के लोकसंख्या असलेल्या शेतकऱ्यांच्या. कुटुंबांपैकी एखाद्यास या प्रांताचे मुख्य प्रधानपद प्राप्त झाल्याचे दृश्य मला पाहावयाचे आहे. "

खेड व दापोली येथे छोटी छोटी भाषणे करून ते महाडला पोहोचले. महाड ी समरभूमी. तेथेच त्यांनी कोकणातील सनातनी हिंदू आणि प्रतिगामी शक्तींशी

पहिले युद्ध केले होते. महाडातील प्रचंड सभेत त्यांनी हृदय थरारून सोडणारे भाषण केले. ते म्हणाले, " चालू राजवटीचे धोरण अगदी निराशाजनक आहे." सुमारे सहाशे मैल प्रवास करून आंबेडकर २१ मे रोजी मुंबईस परतले. भाषणांमागून भाषणे करून त्यांचा घसा कोरडा पडला होता. आवाज साफ बसला होता. तो इतका की शेवटच्या सभेत त्यांच्या मुखावाटे शब्द फुटेना.

मुंबईत परत आल्यावर आंबेडकरांनी एका मुलाखतीत सांगितले, "आमच्या पक्षाला वाढता पाठिंबा मिळत आहे हे पाहून मला अत्यंत समाधान वाटत आहे. खोती नष्ट करून त्यांची गुलामगिरी नष्ट करण्याचे जे मी प्रयत्न करीत आहे, त्याविषयी लोकांना कृतज्ञतेची जाणीव असून त्याला मान्यताही आहे. आमचा स्वतंत्र मजूर पक्ष निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांची पूर्ती करण्यासाठी झटत आहे. परंतु जर काँग्रेस पक्षाने घटनात्मक मार्गातून त्यांची प्रगती करण्याचे नाकारले व लोकांचा काँग्रेस पक्षावरील विश्वास उडाला, तर पुढील मार्ग स्पष्टच आहे. समाजवाद्यांचा दृष्टिकोन पाहून मी आश्चर्यचकित झालो आहे. अनेक वर्षे ते जमीनदारी पद्धतीचा व भांडवलशाहीचा नायनाट करण्याच्या आरोळ्या मारीत आहेत. परंतु ते उद्दिष्ट साधण्यासाठी जेव्हा मी प्रत्यक्ष विधेयक मांडले त्यावेळी ते मूग गिळून बसले."

ह्याच सुमारास मध्यप्रांतामध्ये काँग्रेस पक्षाच्या मंत्रिमंडळात पेचप्रसंग निर्माण झाला. काँग्रेसच्या बडचा नेत्यांनी डॉ. ना. भा. खरे यांना दंडेलीने बंडखोर ठरवून बडतर्फ केले. लोकशाहीच्या दृष्टीने आपले वर्तन, आपली भूमिका कशी योग्य आहे हे लोकांना विशद करून सांगण्यासाठी डॉ. खरे यांनी महाराष्ट्रातील काही प्रमुख ठिकाणी सभेतून आपले म्हणणे मांडले. ऑगस्ट १९३८ च्या पहिल्या आठवड्यात अशीच एक सभा मुंबईत आर. एम. भट माध्यमिक शाळेमध्ये भरली होती. सभेला अतोनात गर्दी लोटली होती. सभेला तीन आकर्षणे होती. सत्यशोधक गांधीजींनी डॉ. खऱ्यांच्या राजिनाम्याचा कच्चा खर्डा आपण लिहिलेला नाही, असे खोटे निवेदन केले होते. डॉ. खऱ्यांनी गांधीजींचे निवेदन धादांत खोटे आहे असे सिद्ध केले होते. तिसरे आकर्षण म्हणजे डॉ. खऱ्यांना एक हरिजन मंत्री घेण्यास गांधीजींनी केलेला विरोध. यामुळे डॉ. खऱ्यांच्या शोकांतिकेला फारच रंग चढला होता. काँग्रेसने फटकारलेल्या डॉ. खऱ्यांना आपली सहानुभूती दर्शविण्यासाठी डॉ. बा. शि. मुंजे, उपस्थित होते. डॉ. मुंजे, बॅ. जमनादास मेथा नि आंबेडकर यांची भाषणे झाली. मध्यप्रांताच्या विधिमंडळातील प्रमुख पक्षाचे नेते म्हणून

डॉ. खऱ्यांना आपल्या निवडीचे मंत्रीमंडळ बनविण्याचा अधिकार आहे असा सर्वांनी अभिप्राय दिला. डॉ. आंबेडकरांनी डॉ. खऱ्यांचा दृष्टिकोन उचलून धरला. सत्य डॉ. खरे यांच्या पक्षाला आहे. डॉ. खऱ्यांवर काँग्रेस श्रेष्ठींनी अन्याय करून लोकशाहीच्या नावाला हरताळ फासला आहे. गाडीला दोन चाके असल्याशिवाय गाडी चालणार नाही. दोन प्रभावी पक्ष असल्याविना कोणत्याही देशाचा राज्यकारभार सुरळीत चालणार नाही, असा डॉ. आंबेडकरांनी अभिप्राय दिला. गंमत अशी की, डॉ. खरे स्वत: हरिजन सेवक संघाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते. गांधीजींनी डॉ. खऱ्यांसंगे मध्यप्रांतात हरिजनकार्यासाठी दौरा काढला होता. तरीसुद्धा गांधीजींनी डॉ. खऱ्यांना हरिजन मंत्री घेण्यास कसून विरोध केला. यापूर्वी एक सभा या सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीमध्ये भरली होती. काँग्रेस श्रेष्ठींच्या लोकशाहीविरोधी कृत्याचा सर्वांनी जळजळीत विरोध केला. या सभेचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. ते म्हणाले, "बहुमतामुळे राज्यकर्ता पक्ष भ्रष्ट बनतो. अनिर्बंध बहुमताने तो पूर्णपणे भ्रष्ट होतो". ह्या राजकीय सुभाषिताची त्यांनी सभेला आठवण करून दिली. आंबेडकरांच्या ह्या बोलात मोलाचे विचार आहेत. सध्या देशात या बोलाचा प्रतिध्वनी उमटला आहे.

त्या काळी डॉ. आंबेडकरांच्या समक्ष गांधीजी पवित्र माणूस आहेत असे कोणी म्हटले तर बाबासाहेब ताडकन बोलत, "गांधीजी घुबडासारखे अपवित्र, अशुभ आहेत." गांधींचे गोलमेज परिषदेच्या वेळचे वागणे अत्यंत विश्वासघातकीपणाचे होते. एखाद्या घोटीव बदमाषाने ही असले नीच कपट केले नसते, असे त्यांनी त्वेषाने त्याच समयास 'चित्रा' नावाच्या मराठी साप्ताहिकास मुलाखत देताना उद्‌गार काढले. त्या मुलाखतीत आंबेडकर पुढे म्हणाले, "मुखमे राम और बगलमें छुरी, अशा प्रकारच्या माणसाला जर महात्मा म्हणता येत असेल तर मोहनदास महात्मा आहेत."[१] भारतीय राजकारणात इतकी तिखट जीभ त्या वेळी दुसऱ्या कोणत्याही नेत्याची नसावी. खरा क्रांतिकारक हा गुळमुळीत भाषा बोलत नसतो. तो धूळ नि धूर उठविल्याविना वावरत नसतो !

अहमदाबादपासून पंचवीस–तीस मैल दूर असलेल्या बावला गावातील अस्पृश्य बंधूंनी आंबेडकरांना मानपत्र दिले. तेथील दलितांची केविलवाणी स्थिती पाहून ते गहिवरले. त्यांनी महाराष्ट्रातील अस्पृश्य बंधूंप्रमाणे अंगी धैर्य बाणवावे, आत्मविश्वास बाळगावा, असे बाबासाहेबांनी त्यांना उत्तेजन दिले. परत येताना

१. केळकर न. चिं., गतगोष्टी, पृ. ७३४.

त्यांचे क्षेमाभाई सभागृहामध्ये भाषण झाले. त्या वेळी ते म्हणाले, "मी गांधीजींना विरोध करतो हे सत्य आहे. कारण गांधीजींवर आपला विश्वास नाही. गांधीजी अस्पृश्य वर्गाचे कल्याण करतील असे मला मुळीच वाटत नाही. जर गांधीजी प्रामाणिक आहेत तर ते मध्यप्रांत मंत्रिमंडळात आणि मुंबई मंत्रिमंडळात अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी घ्यायला का आज्ञा देत नाहीत ?" ते पुढे म्हणाले, "काँग्रेसपक्षीय राज्यकर्ते जमिनीवरील कर कमी करीत नाहीत. श्रीमंतांवर कर बसविण्यास राजी नाहीत. पूर्वीच्या सरकारने दलित वर्गीयांना कसण्याकरिता जमीन पोलिस दलात नोकऱ्या आणि काही प्रमाणात सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा अशा तरतुदी केल्या होत्या. परंतु काँग्रेस सरकार त्यांची पर्वा करीत नाही." ऑक्टोबरच्या शेवटच्या दिवशी स्वतंत्र मजूर पक्षाच्या बेळगाव शाखेने निपाणीला बोलाविलेल्या परिषदेसाठी आंबेडकर गेले. तेथे त्यांचा भव्य प्रमाणात सत्कार करण्यात आला. गगनभेदी आरोळ्यांनी आसमंत निनादला. आंबेडकरांना रथात बसवून एक मैल लांबीची मिरवणूक काढण्यात आली. रथाला पन्नास बैल जुंपले होते. त्या काळी महान नेत्यांची मिरवणूकही अशीच निघायची.

मध्यंतरी औद्योगिक कलहाचे विधयक सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विधिमंडळात विचारासाठी मांडले गेले. आंबेडकर नि जमनादास मेथा यांनी त्या विधेयकाला कडकड्न विरोध केला. ज्याअर्थी काही विशिष्ट परिस्थितीत संप करणे बेकायदेशीर ठरविले आहे, त्याअर्थी सदर विधेयक वाईट आहे. रक्ताने डागळलेले आहे. रक्तपिपासू आहे. जे विधेयक कामगारांच्या संप करण्याच्या हक्काला बाधा आणते ते मालकांना मात्र आपला अर्थसंकल्प उघड करण्यास भाग पाडत नाही. आणि पोलीस दलाचा उपयोग कामगारांविरुद्ध करण्याची मुभा मागत आहे. असा विरोधकांच्या म्हणण्याचा सूर वाहत होता.

आंबेडकरांनी आपले मत असे दिले की, ' संप करणे हा दिवाणी अपराध आहे. फौजदारी गुन्हा नव्हे. मनुष्याच्या इच्छेविरुद्ध त्याला काम करण्यास भाग पाडणे म्हणजे त्याला गुलाम बनविणे होय. कामगाराला शिक्षा करणे म्हणजे त्याला गुलाम करणे. आणि युनायटेड स्टेटस्च्या घटनेत म्हटल्याप्रमाणे गुलामगिरी म्हणजे अनैच्छिक दास्य होय. संप म्हणजे कामगारांचा आपण कोणत्या अटींवर नोकरी करण्यास तयार आहोत हे सांगावयाचे स्वातंत्र्य असलेला हक्क होय. जर काँग्रेस नेत्यांना स्वातंत्र्याचा हा पवित्र हक्क आहे, असे वाटत असेल तर कामगारांचा संप करण्याचा हक्क हासुद्धा पवित्र आहे. असे माझे म्हणणे आहे.'

विधेयकाला 'कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्याच्या गळचेपीचा कायदा' हे नांव यथार्थपणे शोभून दिसले असते, असे सांगून आंबेडकर पुढे म्हणाले, 'ते पुच्छगामी व प्रगतिविरोधक असल्यामुळे कामगारांच्या संपकरण्याच्या हक्काला त्याने मर्यादा घातली आहे. संप करणे त्याने अशक्य केले आहे. तो बेकायदेशीर ठरविला आहे. आणि म्हणूनच या विधेयकाचा जनक हा १९२९ च्या औद्योगिक कलहाचा कायदा करणाऱ्यांपेक्षाही अधिक प्रगतिविरोधी आहे.' हा शेवटचा टोला मुनशींच्या वर्मी बसला. त्यामुळे पुन्हा उभयतांची जुंपली. त्यातील शेवटची उत्तरे प्रत्युत्तरे खालीलप्रमाण होती.

मुनशी—मोलमजुरी करणाऱ्यांच्या नशिबी त्यामुळे गुलामगिरी आली असती.

आंबेडकर—ती पुरेशी आहे. या विधेयकात त्याच्याही पुढे आणखी एक पाऊल टाकायला तुम्हाला अशी लाज वाटायला नको होती.

सभापती – शांतता राखा. शांतता राखा.

इतके झाल्यावर आंबेडकरांनी सरकारची पुन्हा एकदा भंबेरी उडवली. ते म्हणाले, 'जे सरकार आपण कामगारांच्या मतांवर निवडून आलो असा दावा सांगते, त्या सरकारने निवडणुकीच्या वेळी कामगारांना दिलेल्या आश्वासनांना हरताळ फासला आहे. ही लोकशाही कामगारांना गुलामगिरीत टाकीत आहे. ही लोकशाही कसली ? ही लोकशाहीची विटंबना आहे.' आंबेडकर नि जमनादास मेथा या दोन कामगारनेत्यांनी आपल्या वादकुशलतेच्या आणि श्रेष्ठ दर्जाच्या बुद्धिमत्तेच्या बळाने त्या विधेयकावर असा निकराचा हल्ला केला, त्यावर असे त्वेषाने घण घातले की, मंत्रिमंडळ त्यामुळे चांगलेच हैराण झाले. परंतु काँग्रेस मंत्रिमंडळाने ते विधयक 'शेंडी तुटो की पारंबी तुटो' ह्या निर्धाराने संमत करून घेण्याचे ठरविले असल्यामुळे त्यांनी विधिमंडळाकडून ते मंजूर करून घेतलेच.

काँग्रेस मंत्रिमंडळाच्या ह्या दुराग्रही कृतीमुळे विधिमंडळाच्या बाहेर औद्योगिक शहरांतून त्या कायद्याचा 'काळाकायदा' म्हणून धिःकार करण्यात आला. त्या काळचा कायद्याविरूद्ध विरोधाची लाट उसळली. कामगारांनी नापसंती दर्शविली. सात नोव्हेंबर १९३८ रोजी स्वतंत्र मजूर पक्ष नि गिरणी कामगार युनियन ह्यांनी एक दिवसाचा संप करण्याचे जाहीर केले. त्याबरोबर नियोजित संपाच्या बाजूने कामगार नेत्यांनी आणि संपाचा बार वाया जावा म्हणून काँग्रेस नेत्यांनी मुंबईत तुफानी प्रचार सुरू केला.

सुमारे निरनिराळ्या साठ कामगार संघांनी संपाचे शिंग फुंकले. संपाच्या आदल्या दिवशी रात्री आठ वाजता गिरणी कामगार युनियनची जमनादास मेथा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक भरून त्याच्या कार्यक्रमाची रूपरेषा पक्की करण्यात आली. आंबेडकर, परुळेकर, मिरजकर, डांगे, निमकर आणि इतर नेते सभेस उपस्थित होते. कार्यकारी मंडळाने एक प्रचंड मिरवणूक काढायचे ठरविले. गिरण्यांच्या नि कारखान्यांच्याही समोर शांततेने निरोधन करण्याचे ठरविले. तसे औद्योगिक शहरांतील कामगारांना ह्या कामगारविरोधी विधेयकावरील आपला संताप व्यक्त करण्यास त्या बैठकीत आवाहन करण्यात आले.

आंबेडकरांनी आपल्या पक्षाचे आमदार बोलावून एक कृती समिती नेमली. संप यशस्वी करण्याच्या दृष्टीने काळजीपूर्वक कार्यक्रम आखण्यात आला. ह्या सभेला जमनादास मेथा उपस्थित होते. पक्षातील कार्यकर्त्यांना काम करण्यासाठी शहरातील निरनिराळे भाग नेमून देण्यात आले. मानवेंद्रनाथ रॉय ज्यांना पाय वर नि डोके खाली केलेले गांधीवादी म्हणत त्या काँग्रेस समाजवाद्यांनी आंबेडकरांशी सहकार्य करायचे नाकारले. कारण त्यांना असे वाटले की, आंबेडकर संपाचा उपयोग आपला पक्ष बलवान करण्यासाठी करीत आहेत. काँग्रेस पक्षाचे धुरंधर अन् धूर्त संघटक स. का. पाटील ह्यांनी कामगार विभागात काँग्रेसच्या काही सभा भरविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे कॉटनग्रीन येथे एका सभेत त्यांनी स्वतः एक जोरदार भाषण ठोकले. काँग्रेस संघटनेची प्रतिष्ठा वा अस्तित्व धोक्यात येईल तेथे तेथे विघ्नहर्ता म्हणून पाटलांना आवाहन करण्यात येते ते त्यांच्या संघटनचातुर्यामुळे.

सरकारने मुंबईच्या आसपास असलेल्या जिल्ह्यांतून तीनशे हत्यारी पोलीस नि बारा अधिकारी बोलावून त्यांना मुंबईच्या गिरण्यांच्या आसपास, मोक्याच्या ठिकाणी पहाऱ्यावर ठेवले. स्वतंत्र मजूर पक्ष हा संपाचा खरा कणा होता. त्या पक्षाने आपल्या हजारो स्वयंसेवकाच्या हस्ते शहराच्या निरनिराळ्या भागात पत्रके वाटून संप यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले होते. अशा रीतीने सरकार आणि कामगार दोन्हीं पक्ष दंड थोपटून उभे राहिले.

आदल्या दिवशी सायंकाळी सुमारे ऐशी हजार कामगारांची प्रचंड सभा कामगार मैदानावर झाली. त्या सभेचे अध्यक्ष जमनादास मेथा होते. त्यांनी काँग्रेस मंत्रिमंडळाचे वाभाडे काढले. दुसऱ्या कामगार नेत्यांनी जोरदार भाषणे करून त्या कामगार विरोधी कायद्याचा धिःकार केला. कामगारांनी काळचा कायद्याचे

पाश तोडून टाकावेत असे इंदुलाल याज्ञिक म्हणाले. काँग्रेस नेत्यांच्या हास्यास्पद विचारसरणीची डांगे यांनी टिंगल केली. आंबेडकरांनी काँग्रेस मंत्रिमंडळावर चौफेर हल्ला केला आणि संप यशस्वी करा, अशी कामगारांना कळकळीची विनंती केली.

ह्या सभेनंतर कामगारांच्या त्या प्रचंड मेळाव्याने मिरवणूक काढली. ती परळ, लालबाग, डिलाईल रोड मार्गे वरळी येथील जांबोरी मैदानात विसर्जन पावली.

६ नोव्हेंबर १९३८ च्या रात्री कामगार नेत्यांची पुन्हा बैठक भरली. संपाचे नियंत्रण करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. तिच्याही अध्यक्षपदी जमनादासांना निवडण्यात आले. आंबेडकर, डांगे, निमकर, मिरजकर आणि प्रधान त्या समितीचे सभासद होते. नव्वद टक्के स्वयंसेवक आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे होते.

७ नोव्हेंबर १९३८ ची प्रभात उजाडली. दिशा फाकताच पोलिस अधिकाऱ्याची धावपळ सुरू झाली. ते आपापल्या जागी सिद्ध राहिले. गृहमंत्री मुनशी यांना परिस्थितीची कल्पना होती. त्यांनी पोलिस आयुक्तांना अशी ताकीद दिली होती की शांतताभंग होऊ नये म्हणून व्यवस्थेत जरासुद्धा कुचराई होता कामा नये. ठरल्याप्रमाणे सकाळी संप शांततेच्या गंभीर वातावरणात सुरू झाला. संपनिरोधनाच्या कार्यक्रमांत कामगारांना एक अत्यंत मौजेचे दृश्य दिसले. जमनादास नि आंबेडकर ही कामगारनेत्यांची जोडगोळी लाल निशाणांनी सुशोभित केलेल्या एका मोटारमधून कामगारांना ध्वनिक्षेपकावरून संप यशस्वी करण्यासाठी आज्ञा देत फिरत होती. बहुतेक सर्व कापड गिरण्या नि नगरपालिकेचे कारखाने बंद होते. दोन–चार गिरण्यांत काही कामगार काम करीत होते.

जनतेच्या सरकाराविरुद्ध भारतात कामगार नेत्यांनी संघटित विरोधास तोंड देऊन हा संप लढविला गेला होता. भांडवलशाहीने पोसलेली व काँग्रेसभक्तांकडून चालविलेली वृत्तपत्रे मात्र संपाच्या विरुद्ध होती. त्यांनी सरकारला पाठिंबा दिला. नवीन सुधारणा करण्याच्या दृष्टीने काँग्रेस पक्ष अधिकारावर राहावा असे ज्यांना वाटे, ती अँग्लो इंडियन पत्रे संपाच्या विरुद्धच होती. त्या सर्वांनीच संपाचे महत्त्व कमी करण्याच्या दृष्टीने नि कामगार–जगातील आंबेडकरांच्या वाढत्या वजनाचे वैषम्य वाटत असल्याने संपाविषयी बनावट प्रतिवृत्ते प्रसिद्ध केली.

डिलाईल रोड हे कामगारांचे शक्तिकेंद्र, त्यांचा बालेकिल्ला. तो विभाग दोन्ही पक्षांच्या सामन्यांचे केंद्र व्हावे हे साहजिकच होते. तेथे दगडफेकीमुळे काही माणसांना किरकोळ दुखापती झाल्या. एक पोलिस अधिकारी आणि काही पोलिस

जखमी झाल्यामुळे पोलिसांनी गोळीबार केला. त्यात दोन इसमांना जखमा झाल्या. परळ रस्त्यावर एक वाईट गोष्ट घडली. एका मनुष्याने मुनशींच्या गाडीवर हल्ला केला. गाडीच्या काचांचा चक्काचूर झाला. सरदार पटेल, मथुरादास त्रिकमजी आणि भवानजी अर्जून खिमजी हे मुनशींच्या गाडीत होते. सुदैवाने त्यांपैकी कुणालाच दुखापत झाली नाही. एकंदर ७२ लोक जखमी झाले. अकरा जणांना प्राणांतिक जखमा झाल्या. पस्तीस लोकांना अटक झाली. सर्व शहर निदर्शनांनी गरजले.

मुंबईतील कामगार नेत्यांच्या आवाहनानुसार सर्व प्रांतभर औद्योगिक शहरांतून काही प्रमाणात संप झाला. त्या ठिकाणी मिरवणुका निघाल्या. निरोधने नि निदर्शने झाली. अहमदाबाद, अमळनेर, जळगाव, चाळीसगाव, पुणे, धुळे, ह्या ठिकाणांपर्यंत संपाचे लोण पोचले होते.

संपाच्या कार्याची तर मोठी रंगदार भैरवी झाली. संध्याकाळी कामगार मैदानावर कामगारांची प्रचंड सभा भरली. सभेचे अध्यक्ष जमनादास मेथाच होते. सभेत रणदिवे, निमकर, डांगे, मिरजकरप्रभृति कम्युनिस्ट नेत्यांनी त्या काळच्या कायद्याचा कडकडून धिक्कार केला. काळच्या कायद्याचे एक प्रतीक आणि दुसरे गृहमंत्र्यांचे प्रतीक असे दोन पुतळे सभेच्या शेवटी जाळण्यात आले. आंबेडकरांचे तेथे एक जळजळीत भाषण झाले. भाषणाच्या आरंभी त्यांनी संप यशस्वी केल्याविषयी कामगारांचे हार्दिक अभिनंदन केले. ज्या सायंकाळच्या वृत्तपत्रांत संप फसल्याविषयी विपर्यस्त माहिती दिली होती, त्यांचे त्यांनी सरकारचे बगलबच्चे असे वर्णन करून निषेध केला. संप पूर्णपणे यशस्वी झाल्याची त्यांनी ग्वाही दिली. ते कामगारांना म्हणाले, "केवळ सभांना उपस्थित राहून घसा फुटेपर्यंत काळच्या कायद्याचा निषेध करून किंवा निषेध व्यक्त करून तुमचे कार्य होणार नाही. आपले प्रतिनिधी निवडून देऊन तुम्ही राज्यसत्ता हस्तगत केली पाहिजे." आपल्या भाषणाच्या शेवटी ते म्हणाले, "काँग्रेसने ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध जर खराखुरा लढा उभारला तर मी काँग्रेसला जरूर जाऊन मिळेन."

संपाविषयी आपल्या निवेदनात सरदार पटेल म्हणाले की, "संपाच्या नेत्यांनी बळजबरीचे मार्ग अवलंबिले." यावर आंबेडकर म्हणाले, "पटेलांचे निवेदन म्हणजे अथपासून इतिपर्यंत असत्याने विणलेले जाळे आहे."

ह्या संपातून दोन गोष्टी निष्पन्न झाल्या. पहिली गोष्ट अशी की, आंबेडकर कामगार क्षेत्रात आपले वजन पाडू शकले. त्यांच्या संघटनेने महत्त्वाचे कार्य केले आणि ती श्रेष्ठ प्रतीची ठरली. प्रथमश्रेणीचे कामगारनेते म्हणून आंबेडकरांची कीर्ती

झाली. त्यामुळे अखिल भारतीय कामगारांच्या प्रश्नांशी त्यांचे भविष्यकाळात जे नाते जोडले जाणार होते त्याचा तो पाया ठरला. दुसरी गोष्ट अशी की, कामगारांच्या हितासाठी कम्युनिस्ट नि आंबेडकर यांनी एक आघाडी बनविली. तथापि, आंबेडकरांनी आपला पक्ष नि संघटना ही धूर्तपणे आणि सावधपणे कम्युनिस्टांपासून अलग ठेवली. आणि त्या क्षेत्रात त्यांनी आपली छाप बसविलीच.

७ नोव्हेंबरचा संप ही फार महत्त्वाची अशी गोष्ट ठरली. त्याचे महत्त्व एवढे होते की, संयुक्त प्रांतातले नाणावलेले किसान पुढारी स्वामी सहजानंद आंबेडकरांना मुंबईत त्याच्या निवासस्थानी येऊन भेटले. मुंबईतील कामगारांचे प्रश्न नि सर्वसाधारण भारतातील शेतकऱ्यांचे प्रश्न ह्यांवर त्यांनी आंबेडकरांशी चर्चा केली. ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध एकजूट करण्यासाठी आंबेडकरांनी काँग्रेसला मिळावे असा त्यानी आंबेडकरांशी आग्रह धरला. आंबेडकर म्हणाले, "काँग्रेसने ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध जर लढा पुकारला असता, तर मी त्या पक्षाला मिळालो असतो. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. काँग्रेस पक्ष आपल्या हाती आलेली घटनात्मक यंत्रणा भांडवलवाले नि अव्याहत स्वार्थी हिताने बरबटलेले लोक ह्यांच्या हितासाठीच राबवीत आहे. त्याने शेतकरी व कामगार ह्यांच्या हिताचा बळी दिला आहे. असल्या ह्या संघटनेला मी मिळू शकणार नाही."[१]

डिसेंबर १९३८ च्या शेवटच्या आठवड्यात औरंगाबाद येथे औरंगाबाद जिल्हा दलित वर्गाच्या परिषदेचे अध्यक्षपद बाबासाहेबांनी स्वीकारले. अशा तऱ्हेची दलित वर्गाची हैद्राबाद संस्थानातील ही पहिलीच परिषद. त्या परिषदेच्या स्वागताध्यक्षांनी तेथील दलित वर्गाच्या स्थितीचे वर्णन मोठ्या परिणामकारक भाषेत केले. तेथील दलित वर्गीयांचा कसा छळ होत असतो, त्यांना मुसलमान धर्मात कसे जबरीने ओढले जाते, आणि मुसलमानांचे साह्य घेऊन ब्राह्मण हे अस्पृश्यांचे सार्वजनिक तळ्यावर पाणी भरण्याचे नि मंदिरप्रवेशाचे प्रयत्न कसे हाणून पाडतात ह्यावर त्यांनी विदारक प्रकाश पाडला. आंबेडकरांनी त्यांना 'स्वावलंबी बना' असा संदेश दिला.

---

१. *जनता, ३१ डिसेंबर १९३८.*

स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा

(१) नवीन सुधारणांविषयक धोरण

नवीन सुधारणात (राज्यघटनेत) भरपूर दोष व व्यंग असल्यामुळे त्या पूर्ण जबाबदारीचे स्वराज्य प्राप्त करून देण्यास असमर्थ आहेत. प्रांतिक कारभारातील कित्येक घटना, विशेषत: सेकंड चेंबरची घटना ही या पक्षाला आक्षेपार्ह वाटते. तथापि या नवीन सुधारणा राबविण्यास हरकत नाही. मात्र जबाबदारीच्या स्वराज्याचे स्वरूप निष्प्रभ करून टाकण्याजोगे जे खास व अनियंत्रित स्वरूपाचे अधिकार गव्हर्नरास मिळाले आहेत, त्यांचा उपयोग या मुदतीत होऊ नये या बद्दल हा पक्ष जागृत राहील.

(२) आर्थिक धोरण

(१) शेतीची प्रगती होऊन तो धंदा जास्त फलद्रुप व्हावा म्हणून लँडमॉर्गेज बँका, उत्पादक, शेतकरी वर्गाच्या सहकारी पतपेढ्या (Co-operative Credit Societies) व खरेदी-विक्री करणारी मंडळे (Marketing Societies) यांची स्थापना करण्याचा या पक्षाचा कार्यक्रम आहे.

(२) शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे प्रत्यक्ष कारण जमिनीची लहान लहान तुकड्यांत होणारी विभागणी हे असून त्यामुळे तीत भांडवल गुंतविण्यास व सुधारलेल्या पद्धतीने शेती करण्यास वाव मिळत नाही असे या पक्षाचे मत आहे.

जमिनीचे तुकडे आणि त्यामुळे शेतकरी वर्गात वावरणारे दारिद्र्य याचे मुख्य कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येला केवळ जमिनीवरच अवलंबून रहावे लागते हे होय आणि जमिनीवर अवलंबून राहणाऱ्या जादा लोकसंख्येची पोषणाची शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायातील तजवीज झाल्यावाचून शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर होणार नाही. या पक्षाचे असे मत आहे की, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आणि

त्यांची उत्पादन शक्ती वाढविण्यासाठी इलाख्यातील उद्योगधंद्यांची वाढ करणे हे मुख्य साधन आहे म्हणून हा पक्ष चालू उद्योगधंद्यांचे पुनरूज्जीवन करून ह्या इलाख्यांत उत्पन्न देणाऱ्या कच्च्या मालाच्या अनुरोधाने नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याचा प्रयत्न करील.

(३) लोकांना आपापल्या धंद्यात प्राविण्य संपादन करण्यात आणि आपली शक्ती वाढविण्यास साह्यभूत होणाऱ्या धंदेशिक्षणाचा विस्तृत कार्यक्रम हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(४) लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रसंगी देशातील उद्योगधंद्यांची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी, असे या पक्षाचे मत आहे.

(५) जीवनाचा पूर्ण आणि स्वतंत्र उपभोग घेणाऱ्या मार्गात उपस्थित होणाऱ्या सर्व अडचणी नाहीशा करण्यासाठी जी आर्थिक पद्धती एखाद्या विशिष्ट वर्गाला किंवा जनतेच्या विभागाला अन्यायकारक होत असेल ती पद्धती बदलणे, सुधारणे किंवा नष्ट करणे हेही या पक्षाचे अंगीकृत कार्य आहे.

(६) सर्व साधारणपणे जमिनदारांकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक अगर त्यांच्याकडून जमिनीचे मागलेपण काढून घेण्याची जमिनदाराची प्रवृत्ती विशेषतः (१) खोती (२) तालुकदारी या पद्धतीत असणारी ही प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरूपाचे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

(७) शेतकरी वर्ग व कामगार वर्ग यांना सुधारलेल्या रहाणी प्रमाणे राहता यावे यासाठी त्यांच्या मुशाहिऱ्यांची किमान मर्यादा ठरविण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(८) कारखान्यांतील कामगार वर्गाच्या हितासाठी कारखान्यांतील नोकरी, बडतर्फी व पगारवाढ, यांच्यावर सरकारी नियंत्रण, कामाचे जास्तीत जास्त तास, कामास योग्य असे वेतन, पगारी रजा, वगैरे स्वरूपांच्या उपकारक योजना व वृद्धपण अगर दुसरे योग्य कारण यामुळे कार्यनिवृत्त होताना बोनस, पेन्शन अगर तशाच प्रकारची दुसरी मदत अशासाठी कायदे मंडळातील कायदे मंजूर करून घेण्याचे प्रयत्न हा पक्ष करील आणि आजारीपण, बेकारी किंवा अपघात अशा प्रसंगी कामगारांची तरतूद करणारी विम्याची खाजगी योजना व कामगारांसाठी स्वस्त भाड्याच्या आरोग्यशीर इमारतींची उभारणी ही कामे हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(९) कारखान्यातील कामगारांच्या हितासाठी आवश्यक असे जे कार्य हा पक्ष करणार आहे, तेच कार्य शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक अशा स्वरूपात हा पक्ष करील.

(१०) बेकारी निवारण करण्याची जबाबदारी सरकारवर आहे, हे तत्त्व या पक्षाला कबूल आहे. त्यासाठी शेती, वसाहती व जमीन नसणाऱ्या आणि बेकार कामगारांना काम मिळण्यासाठी सरकारी कामे सुरू करण्याच्या योजना अंमलात आणण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

(११) जबर व्याज तसेच खोटे व घोटाळ्याचे व्यवहार करणाऱ्या सावकारांपासून गरीब ऋणकोचे संरक्षण होण्यासाठी व शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी योग्य असे कायदे घडवून आणण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

(१२) मोठमोठ्या शहरातील व औद्योगिक कारखान्याच्या भागात पडणाऱ्या मध्यम स्थितीतील लोकांना सोयीस्कर असे घरभाडे पडावे अशा प्रकारचे कायदे हा पक्ष पुढे मांडील.

(३) करधारा पद्धतीविषयक या पक्षाचे धोरण

या पक्षाचे असे मत आहे की, प्रजेचे कल्याण व वाढता उत्कर्ष होण्यास सरकारने राष्ट्रसंवर्धक असे अनेक कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. पण सरकारच्या हाती पैसा असला तरच या गोष्टी करणे सरकारला शक्य होईल. हा पैसा अर्थात् प्रजेकडून कराच्या रूपाने यावयाचा भरपूर पैसा असेल तर स्वराज्याची हमी घेता येते. 'कर कमी झाला पाहिजे आणि तो राष्ट्रोन्नतिला पोषक अशी कार्ये न करता आली तरीही कर कमी झाला पाहिजे तरच त्यात तुमचे हित आहे' या मताचा प्रचार बहुजन समाजात करणे म्हणजे अज्ञ व गरीब जनतेची दिशाभूल करून फसवणूक करण्यासारखे होय. तथापि करधारा पद्धती आहे ती राहू द्यावी असे हा पक्ष म्हणत नाही; एवढेच नव्हे तर चालू पद्धत या पक्षाला नापसंत आहे, कारण ती अन्यायकारक असून गरीब वर्ग त्यात चिरडून जात आहे. ही विषमता दूर करण्याचा हा पक्ष प्रयत्न करील. चालू जमीनधारा पद्धती अत्यंत आक्षेपार्ह असून ती सुधारण्याविषयी हा पक्ष प्रयत्न करील.

(४) सामाजिक सुधारणा

(१) सर्व प्रकारच्या आवश्यक अशा सामाजिक सुधारणा (अ) सनातन्यांकडून समाजसुधारकांवर पडणाऱ्याब हिष्कारास आळा घालणे, (ब) लोकांना

कायद्याने मिळालेले हक्क व जीवन स्वातंत्र्याचा योग्य उपभोग घेणाऱ्या काही व्यक्तींना अगर विशिष्ट वर्गाला दहशत अगर बहिष्कार घालण्यासारखे प्रयत्न, कायद्याने शिक्षेस पात्र ठरविणाऱ्या कायद्याची योजना.

(२) धार्मिक द्रव्यनिधीचा दुर्विनियोग, गैरव्यवस्था होऊ नये म्हणून सार्वजनिक धर्मादायिका संस्थांवर सरकारी नियंत्रण ठेवणारे कायदे करणे आणि या द्रव्यनिधीतून संकल्पित विनियोग होऊन शिल्लक राहिल्यास त्याचा शिक्षणासारख्या लौकिक कार्यात उपयोग करता येणारे कायदे करणे.

(३) भिकारी व दुसरे अनाथ निराश्रित लोक यांच्या तरतुदीची कायद्याने योजना करणे.

(५) ग्रामसंघटना

(१) ग्राम–संघटनेच्या दृष्टीने आवश्यक अशी सुखाची राहणी ग्रामीण जीवनात प्राप्त व्हावी यासाठी शक्य त्या उपाययोजना करणे.

(२) सामान्यतः नगर-रचनेच्या पद्धतीवरच खेड्याची रचना असावी अशा प्रकारच्या योजनेने खेड्यातील घरे बांधून आरोग्य सुधारणे.

(३) खेड्यात वाचनालये, सार्वजनिक हॉल, रेडिओ, फिरते सिनेमा यांची योजना करून जनपदाची विचार परंपरा प्रख्यात व प्रगमनशील करणे.

(६) शिक्षण

(१) मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अंमलात आणणे.

(२) सर्वसाधारणपणे साक्षरता प्रचारासाठी अशिक्षित प्रौढ मनुष्याच्या शिक्षणाची योजना.

(३) औद्योगिक शिक्षणावर विशेष भर देणे.

(४) शिक्षणात मागासलेल्या जातीतील होतकरू तरुणात, भारतात व परदेशात उच्चशिक्षण घेता येण्यासाठी सरकारी मदत मिळेल, अशी कायदेशीर योजना करणे.

(५) इलाख्यात आवश्यक भागात प्रत्यक्ष शिक्षण देणारी प्रादेशिक विश्वविद्यालये स्थापन करून विश्वविद्यालयीन शिक्षणाची पुनर्घटना करण्याचे कायदे हा पक्ष पुढे आणील. विद्यार्थ्यांचे श्रम व त्यांची बुद्धीमत्ता मातीमोल करून टाकणाऱ्या परीक्षांची प्रस्तुतची अनिष्ट पद्धती नष्ट करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

(७) राज्य कारभार

(१) राज्य कारभाराची पद्धती सूक्ष्म व इष्टपरिणामकारक व दोषरहित असावी असे या पक्षाचे प्रयत्न चालू आहेत.

(२) वरील नं. १ पोटकलमातील उद्देशासाठी हा पक्ष (१) न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत करणे व (२) आधुनिक परिस्थितीला अनुरूप अशी वेतनपद्धती योजणे या दोन योजना हाती घेईल.

(३) सरकारी नोकरीत एका ठिकाणी एकाच जातीचा अगर वर्गाचा भरणा होऊ नये असे या पक्षाचे धोरण आहे. राज्यकारभार परिणामकारक होण्याकरिता इलाख्यातील सरकारी नोकरीत सर्व जाती व वर्गास योग्य प्रमाणात प्रवेश मिळेल असे प्रयत्न हा पक्ष करील.

शासकीय समाजवाद

● डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१९३७–३८ सालानंतर कामगारवर्गाची डावी चळवळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभी केलेली दलित चळवळ यामध्ये दरी निर्माण झाली. ती दरी डाव्या चळवळीतल्या पुढाऱ्यांनी कधीही सांधली नाही. उलट दलित चळवळीवला कामगारांच्या चळवळीपासून दूर कशी ठेवता येईल ह्याचाच ह्या मंडळींनी प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेबांनी कामगारांच्या प्रश्नांची व चळवळीची कधीच निर्भत्सना केली नाही. उलट डाव्या चळवळीतील नेत्यांनी मात्र सतत बाबासाहेबांना भांडवली लोकशाहीचे समर्थक ठरवून त्यांची ही चळवळ सर्वांगीण मुक्तीची नसून सुधारणावादी होती असे शेरे मारले. समाजसत्तावादाबद्दल जरी डॉ. बाबासाहेबांच्या डोक्यात काही शंका होत्या, आक्षेप होते तरी बाबासाहेब मात्र कामगार चळवळीच्या कधीही विरोधी गेले नाहीत. डाव्या चळवळीची नेतृत्व मात्र गेल्याचा भरपूर पुरावा सापडतो. कामगारांच्या चळवळीबद्दल त्यांना कशी आस्था होती हे दाखविण्यासाठी आम्ही डॉ. आंबेडकरांच्या 'राज्ये नी अल्पसंख्याक' या पुस्तकामधील उतारा येथे मुद्दाम देत आहोत.

–संपादक

शासकीय समाजवाद

या पोटकलमाचे मुख्य उद्दिष्ट हे आहे की शासनाने जनतेचे आर्थिक जीवन हे अशारीतीने संघटित केले पाहिजे की ज्यायोगे खाजगी उद्योगाचे सर्व मार्ग बंद न करता उत्पादन क्षमतेचे शिखर गाठता येईल आणि त्याचबरोबर संपत्तीचे समान वाटप साधता येईल. या कलमामध्ये जी योजना आखली गेली आहे, त्यामध्ये शेती-मध्ये शासनाची मालकी व शेतीची सामुदायिक कसणूक आणि औद्योगिक क्षेत्रांत सुधारित शासकीय समाजवाद अभिप्रेत आहे. जमीन असो वा उद्योग असो शासनाने भांडवल पुरवठा केल्याखेरीज त्यातून भरीव परिणाम साधले जाणार नाहीत. या कलमांत विमा धंद्याची राष्ट्रीयकरण करण्याची योजना आहे. याची दोन उद्दिष्टे आहेत. विमा धंद्याच्या राष्ट्रीयकरणामुळे विमा उतरवणाऱ्या व्यक्तिला त्याच्या विम्याची अखेरची रक्कम मिळण्याच्या बाबतीत शासन जबाबदार असल्यामुळे खाजगी विमा कंपन्यापेक्षा जास्त शाश्वती तयार होते. त्याचबरोबर शासनाला आर्थिक नियोजनासाठी आवश्यक आर्थिक साधन उपलब्ध होते. असे केले नाही तर शासनाला नाणे बाजारातून जास्त व्याजाने कर्ज उभारण्याचा मार्ग पत्करणे भाग पडेल. जलद औद्योगिक विकासासाठी भारताला शासकीय समाजवाद आवश्यक आहे. खाजगी उद्योग ही गोष्ट करू शकणार नाही आणि त्याने जर हे केले तर त्यातून युरोपमध्ये खाजगी भांडवलाने जशी विषमता तयार केली तशी इथेही होईल आणि या बाबतीत भारताने धडा घेणे आवश्यक आहे. जमीन खात्याचे एकत्रीकरण आणि कुळ कायदे उपयुक्त नाहीत. नव्हे त्यापेक्षाही वाईट आहेत. त्यामुळे शेतीची भरभराट होणार नाही. खात्याचे एकत्रिकरण अथवा कूळ कायदे यांची ६ कोटी अस्पृश्यांना कोणतीही मदत होणार नाही. कारण ते निव्वळ भूमीहीन मजूर आहेत. खात्यांचे एकत्रीकरण अथवा कूळ कायदे करून त्यांचा प्रश्न सुटणार नाही. या कलमामध्ये आखून दिलेल्या सामुदायिक शेती संघटित करण्यानेच त्यांना मदत होणार आहे. यामुळे जमिनीतील हितसंबंध नष्ट केले जात नाहीत. म्हणून त्या कारणाकरिता या योजनेला विरोध असण्याचे कारण नाही.

या योजनची दोन विशेष अंग आहेत. एक म्हणजे ती आर्थिक जीवनाच्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये शासकीय समाजवादाचा पुरस्कार करते आणि त्याचबरोबर ही योजना शासकीय समाजवादाची प्रस्थापना करण्याचा प्रश्न कायदेमंडळाच्या इच्छेवर सोपवत नाही. ही योजना शासकीय समाजवादाची प्रस्थापना संविधानाच्या कायद्याने करते आणि यामुळे कायदेमंडळाच्या अथवा शासकीय यंत्रणेच्या कृत्याने बदलता येणार नाही अशी तरतूद करते.

संविधानात्मक कायद्याचे अभ्यासक, या विरोधी आपला तावडतोब निषेध व्यक्त करतील. ते खात्रीने असे विचारतील की ही योजना नेहमीच्या पद्धतीच्या मूलभूत हक्काच्या कक्षेबाहेर जात नाही का ? त्याला माझे उत्तर आहे की जात नाही जर ती तशी कक्षेबाहेर जात आहे असे वाटत असेल तर ती तशी वाटण्याचे कारण हे आहे की यावर टीका करणाऱ्याचा पाया हा मूलभूत हक्कांच्या संकल्पनेच्या संकुचितपणात आहे. याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की मूलभूत हक्कविषयक संविधान कायद्याच्या क्षेत्राविषयीच्या संकुचित कल्पना लक्षात घेऊनही या योजनेचे खूप चांगले समर्थन करता येईल, कारण समाजाची आर्थिक रचना आणि स्वरूप व ढाचा कायद्याने आखून देण्यामागील हेतू काय असतो ? इतर व्यक्तींच्या आक्रमणापासून व्यक्तींच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे हा यातील उद्देश असतो आणि हेच मूलमत हक्क रक्षणाचे उद्दिष्ट असते. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि समाजाच्या रचनेचे स्वरूप व ढाचा परस्पर संबंध प्रत्येकालाच उघड दिसेल असे नाही पण तरीही या दोन्हीतील संबंध हे वास्तवात असतानाच खालील गोष्टी लक्षात घेतल्या तर त्या उघड होऊ शकतील.

राजकीय लोकशाही ही चार प्रमेयांवर अवलंबून असते. प्रमेये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) व्यक्ती ही स्वयंकेंद्रित असते.

२) व्यक्तीला तिचे काढून न घेता येणारे अधिकार असतात आणि संविधानाने त्याला त्यांची शाश्वती दिली पाहिजे.

३) स्वतःला काही सवलती प्राप्त करून घेण्याची पूर्वअट म्हणून त्या व्यक्तीला घटनेने दिलेल्या कोणत्याही घटनात्मक हक्काचा त्याग करावा लागता कामा नये.

४) शासन कोणाही खाजगी व्यक्तीला दुसऱ्यावर सत्ता गाजवण्याचे हक्क देणार नाही.

खाजगी (मालकी) उद्योगावर व्यक्तीगत फायद्याचे उद्दिष्ट सफल करण्याच्या पायावर आधारलेल्या सामाजिक अर्थरचनेचा अभ्यास असणाऱ्याला हे स्पष्ट होईल की ही रचना शेवटच्या दोन प्रमेयातील ज्या हक्कावर लोकशाही अवलंबून आहे ते हक्क डावलते किंवा त्याचा पाया पोखरते. स्वतःचे जीवन जगविण्यासाठी किती जणांना आपले घटनात्मक हक्क सोडावे लागतात? किती जणांना खाजगी मालकाकडून स्वतःवर सत्ता गाजवून घेण्याचा प्रसंग येतो ? जे बेकार आहेत त्यांना विचारा की ज्यांना मूलभूत हक्क म्हणतात त्याचा त्यांना काही उपयोग आहे काय? जर एखाद्या बकार माणसापुढे कोणत्याही स्वरूपाची नोकरी मिळणे व याउलट काहीही पगार, कामाचे तास निश्चित न होणे, कोणत्याही युनियनचे सभासद न होण्याचे बंधन

भाषण व संघटना व धार्मिक स्वातंत्र्याचा उपभोग न घेणे, असे पर्याय ठेवले तर तो त्यातील काय निवडेल याच्याबद्दल कोणाला काही शंका असेल का ? याशिवाय वेगळे असे कसे घडू शकेल ? उपासमारीची भीती, एखादे घर गमावण्याची भीती, काही शिल्लक असेल तर ती गमावण्याची भीती, शाळेतून मुले काढून घेण्याची परिस्थितीची भिती, समाजाच्या दानावर ओझे होण्याची भिती, समाजाच्या खर्चाने पुरले अथवा जाळले जाण्याच्या प्रसंगाची भिती या गोष्टी त्या त्या माणसाने आपल्या मूलभूत हक्कांसाठी ताठपणे उभे राहण्याच्या आड येणाऱ्या फार बलवान गोष्टी आहेत. या प्रमाणे बेकारांना कामाची व जगण्याची सवलत मिळविण्याकरिता स्वतःचे मूलभूत हक्क सोडणे भाग पडते.

जे कामावर नोकरीवर आहेत त्यांचे काय ? घटना पंडित असे समजतात की मूलभूत हक्कांचा कायदा करणे हीच त्यांच्या स्वातंत्र्य रक्षणाची हमी आहे आणि त्यासाठी आणखी काही करण्याची जरूरी नाही त्यांचे म्हणणे असे आहे की जिथे खाजगी आर्थिक व सामाजिक व्यवहारामध्ये शासन हस्तक्षेप करीत नाही तेथे, स्वातंत्र्य रहातेच. (त्यांच्या मते) जर कशाची आवश्यकता असेल तर अशा राहिलेल्या स्वातंत्र्याची कक्षा वाढविणे आणि शासनाचा हस्तक्षेप कमीत कमी होईल असे पाहणे. हे खरे आहे की, जिथे शासन हस्तक्षेप करीत नाही तिथे स्वातंत्र्य हे राहते, पण इथे ही गोष्ट संपत नाही. आणखी एका प्रश्नाचे उत्तर देणे बाकी राहते. हे स्वातंत्र्य (मुक्ती) कोणाकरिता आहे ? स्वातंत्र्य म्हणजे जमिनदारांना आपला खंड वाढविण्याचे स्वातंत्र्य, भांडवलदारांना कामाचे तास वाढविण्याचे व पगार कमी करण्याचे स्वातंत्र्य असाच याचा उघड अर्थ होतो. ते असेच राहणार यांच्याशिवाय वेगळे होऊच शकणार नाही. कारण जी अर्थरचना कामगारांच्या मोठ्या सैन्यांचा वापर करते आणि नियमित अंतराने फार मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन करते त्या रचनेमध्ये ते कामगार काम करतील आणि उद्योगधंद्याचा गाडा चालू राहील यासाठी कोणीतरी नियम करणे आवश्यकच आहे. जर शासन हे करणार नसेल तर खाजगी मालक ते करतील. नाही तर जीवनच अशक्य होईल. याचा अर्थ शासनाच्या नियमापासून मुक्तता याचेच दुसरे नाव खाजगी मालकांची हुकूमशाही असाच होतो.

– राज्ये आणि अल्पसंख्यांक या पुस्तकातून –

पान ३०, ३१, ३२, ३३.

लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्वतंत्र भारताच्या घटनेमध्ये हक्क कोणते आणि ते कसे सुरक्षित केले आहेत.



REFBK-0023564

आंबेडकरी चळवळ

दृष्टी

आधारित-चळवळ

वर्णहीन वर्गहीन समाज निर्माण
केल्याशिवाय खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्य
येणार नाही...